**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक १६ | बुधवार, दि.२७ मार्च २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात पंजा व कमळ मध्ये होणार सरळ लढत

**खेमेंद्र कटरे/गोंदिया :** सुरवातीपासूनच भंडारा लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेला असून १९९९ पर्यत काँग्रेसकडे राहिला. १९९९ मध्ये काँग्रेसपासून शरद पवार यांनी वेगळे होत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली.त्यावेळी पहिल्यांदा राष्ट्रवादी काँग्रेस १९९९ मध्ये स्वबळावर निवडणुक लढली. त्यानंतर मात्र २००४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आघाडी झाल्याने भंडारा लोकसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेसकडे आला.

तेव्हापासून २०१९ च्या निवडणुकापर्यंत या लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचा पंजा चिन्ह गायब झालेला होता. अनेकदा काँग्रेसच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांनी मतदारसंघ परत मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रफुल पटेलांच्या दिल्लीतील राजकीय वजनामुळे हा मतदारसंघ काँग्रेसला मिळू शकला नाही. परंतु तब्बल २० वर्षानंतर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या विभाजनामुळे आणि प्रफुल पटेल हे भाजप समर्थित महायुतीत गेल्याने काँग्रेसचा गायब झालेला पंजा निवडणुक चिन्ह पुन्हा बघावयास मिळणार आहे.

दोन दशकानंतर पंजा चिन्ह लोकसभा निवडणूकीत येणार असल्याने कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यातही एक उत्साह दिसून येत आहे.

१९९९ च्या लोकसभा निवडणुकीत पंजा चिन्हावर लढणारे डॉ.श्रीकांत जिचकार हे काँग्रेसचे उमेदवार होते. यांचा पराभव भाजपच्या चुन्नीलाल ठाकूर यांनी केला होता. याच निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जगदिश निंबार्ते यांनी सुमारे ३३ हजार मते घेतल्याने काँग्रेसचा पराभव झाला. २००४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे प्रफुल पटेल यांना भाजपच्या शिशुपाल पटले यांच्याकडून ३००० मतांनी पराभव पत्करावा लागला. तर २००९ च्या निवडणुकीत मात्र भाजपच्या शिशुपाल पटले यांचा पराभव प्रफुल पटेल यांनी करीत राष्ट्रवादी काँग्रेसला पहिल्यांदा लोकसभेत विजय मिळवून दिला.यावेळी अपक्ष उमेदवार नाना पटोले यांनी भाजप उमेदवारापेक्षाही अधिक मते घेतल्याने भाजप उमेदवाराला डिपॉझिटही वाचविता आले नाही. २०१४ मध्ये भाजपच्या तिकिटावर नाना पटोलेंनी निवडणुक लढवित प्रफुल पटेलांचा पराभव केला. तर २०१८ च्या पोटनिवडणुकीत पुन्हा पटोलेंनी भाजपसोडत काँग्रेस प्रवेश केल्याने राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा विजय झाला. परंतु

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत परत भाजपच्या सुनिल मेंढेनी राष्ट्रवादीच्या नाना पंचबुध्देचा पराभव केला.

१९९९ नंतर राष्ट्रवादीला मात्र दोनदाच या मतदारसंघात विजय मिळविता आला आहे. तर भाजपने ४ वेळा विजय मिळविला आहे. आता २०२४ च्या निवडणुकीत पटेलांची घड्याळ नसणार असून काँग्रेसला परत आपला मतदारसंघ मिळाल्याने काँग्रेसमधील जे नेते राष्ट्रवादीत गेलेत ते निवडणुकीच्यावेळी आपला जुना पंजा बघतात की महायुतीचा धर्म म्हणून कमळाला साथ देतात याकडे लक्ष लागले आहे.

भंडारा-गोंदिया या लोकसभा मतदारसंघात २००९ पासून भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी होत आलेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यामुळे या मतदारसंघावर संपूर्ण देशाचे लक्ष लागून असते.राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट पडल्यानंतर या मतदारसंघात अजित पवार गटाचे नेते पटेल यांचाच शब्द पक्षात अंतिम असतो. त्यांना नकार देण्याची सहज कुणी हिमंत करीत नाही, त्यामुळे सगळेच त्यांच्यासोबत गेले. जे सोडून जातात त्यांचे राजकीय जिवन मात्र कमकुवत करण्यात पटेल कशलीही मात्रा ठेवत नाहीत.

भाजपकडून विद्यमान खासदार सुनील मेंढे, माजी राज्यमंत्री डॉ. परिणय फुके यांच्यात उमेदवारीसाठी जोरदार स्पर्धा होती.मात्र सुनिल मेंढे यांनी बाजी मारत परत उमेदवारी आपल्या गळ्यात पाडून घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून खासदार प्रफुल्ल पटेल यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या साक्षीने दावा कायम असल्याचे सांगून भाजपमधील इच्छुकांची धडधड वाढवत आपले वजन कायम असल्याचे दाखवले होते. असेही राष्ट्रवादी काँग्रेस या मतदारसंघातून निवडणूक लढणारच नाही, हे सर्वश्रुत होते.खरं तर २०१४ मध्ये मोठ्याने पराभव पत्करल्यानंतर राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांनी लोकसभेची निवडणुक लढविण्याचा विचारच केला नाही. कारण त्यांना विधानसभेतून राज्यसभेत जाण्याची संधी उपलब्ध झाल्याने.

या दोन्ही जिल्ह्यात जरी त्यांचे राजकीय वजन असले तरी हा मतदारसंघ खरा भाजपच्या ताब्यातच आहे. त्यामुळे पटेलामुळे या मतदारसंघाच्या नावावर शिक्कामोर्तब अडकल्याची जी चर्चा सुरु होती. त्या चर्चेलाच काही अर्थ नसून भाजपच्या उमेदवारामध्ये असलेल्या स्थानिक व बाहेरच्या या दोन मुद्यामुळेच खरं तरं भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला नावावर शिक्कामोर्तब करण्यात अडचण निर्माण झाली होती.यात अखेर स्थानिक हाच मुद्या भाजपने प्राधान्याने घेत बाहेरच्यांना बाहेरचाच रस्ता दाखविला.

भाजपने आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली.त्यावरुन पुर्व विदर्भात भंडारा-गोंदिया कुणबी, तेली समाजाला वर्धा,ब्राम्हण समाजाला नागपूर,कोमठी(आर्य वैश्य)समाजाला चंद्रपूर हे मतदारसंघ निश्चित केले.भाजने २०१८ च्या पोटनिवडणुकीत पोवार समाजाला उमेदवारी दिली,मात्र पटोनिवडणुतील पराभवानंतर समाजाला पुन्हा संधी दिली नाही.२०१९ व २०२४ च्या निवडणुकीत प्रतिनिधीत्व दिलेले नाही.तर तेली समाजाला या मतदारसंघातून कुठल्याच पक्षाने संधी दिलेली नाही.

या सर्व सामाजिक पार्श्वभूमीवर ही निवडणूक भाजपच्या कमळ व काँग्रेसच्या पंजा निवडणुक चिन्हावर होत आहे.उमेदवारी अर्ज भरण्याचा २७ मार्च शेवटचा दिवस असून काँग्रेसचे अधिकृत उमेदवार डॉ.प्रशांत पडोळे व भाजपचे अधिकृत उमेदवार सुनिल मेंढे हे आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.विशेष म्हणजे बहुजन समाज पक्ष व वंचित आघाडीने अद्यापही आपल्या उमेदवाराच्या नावाची घोषणा केलेली नसल्याने उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिवशीच या मतदारसंघात तिहेरी लढतीचे चित्र निर्माण होते की काँग्रेस-भाजमध्येच ही लढाई २० वर्षानंतर सरळ आमोरा-समोर होतेय हे बघायला मिळणार आहे.

## २०२४ लोकसभा निवडणुकीतील विदर्भातील लढती

### नागपूर लोकसभा क्षेत्र



### गोंदिया-भंडारा लोकसभा क्षेत्र



### गडचिरोली-चिमुर लोकसभा क्षेत्र



### रामटेक लोकसभा क्षेत्र



### चंद्रपूर लोकसभा क्षेत्र



## मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी

**मुंबई,:** राज्यातील लोकसभा मतदारसंघात पाच टप्प्यात मतदान होणार आहे. या लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे. याबाबतचे शासन परिपत्रक राज्य शासनाने जारी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. यामध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा, यासाठी परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

या आदेशानुसार निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही, त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे.ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे.

## उपमुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत मुनगंटीवार,नेतेंचा तर पटोलेंच्या उपस्थितीत विकास ठाकरेंचा उमेदवारी अर्ज दाखल




**नागपूर,चंद्रपूर,भंडारा,गडचिरोली :** लोकसभा २०२४ च्या निवडणुकीतील पहिल्या टप्याकरीता २७ मार्च उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने आज २६ मार्च रोजी नागपूर लोकसभा मतदारसंघाकरीता महाआघाडी काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार,माजी मंत्री अनिल देशमुख,आमदार सुनिल केदार,नितिन राऊत यांच्यासह इतराच्या उपस्थिती मिरवणुकीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयात पोचून उमेदवारी अर्ज दाखल केला.

**गडचिरोली-चिमूर लोकसभा** मतदार संघातील भाजप महायुतीचे उमेदवार खा.अशोक नेते यांनी आज मंगळवारी (दि.२६) लोकसभा निवडणुकीसाठी आपला उमेदावरी अर्ज दाखल केले.नेते यांच्या निवासस्थानापासून निघालेल्या महायतीच्या रॅलीत भाजप उमेदवार अशोक नेते ,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे,



वनमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार, अन्न व औषध प्रशासनमंत्री धर्मरावबाबा आत्राम, ज्येष्ठ सहकार नेते अरविंद सावकार पोरेड्डीवार, आ.डॉ.देवराव होळी, आ.कृष्णा गजबे, आ.बंटी भांगडिया,माजी आमदार अतुल देशकर, माजी राज्यमंत्री अमरीशराव आत्राम,माजी आमदार भैरसिंगजी नागपुरे,लोकसभा संपर्क प्रमुख विरेंद्र अंजनकर माजी.जि.प.अध्यक्ष विजय शिवणकर, यांच्यासह महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

**भंडारा-गोंदिया लोकसभा** भंडारा - गोंदिया सार्वत्रिक लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज चार उमेदवारांनी सात अर्ज दाखल केले. आतापर्यत सहा उमेदवारांनी एकूण नऊ नामांकन अर्ज दाखल केले आहे.मंगळवारी अजयकुमार भारतीय, सुमित पांडे, वीरेंद्र कुमार जयस्वाल, विलास राऊत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. आज २४ उमेदवारांनी एकूण ५१ अर्जांची उचल केली. आतापर्यत ९८ इच्छूकांनी २०२ अर्ज दाखल केले.नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याचा उद्या बुधवार शेवटचा दिवस आहे. उद्या सकाळी ११ ते ३ वाजेपर्यत नामनिर्देशनपत्रे सादर करता येतील. २८ मार्च रोजी नामनिर्देशनपत्रांची छाणणी करण्यात येणार आहे. ३० मार्च ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

**चंद्रपूर लोकसभा म**तदारसंघाकरीता २६ मार्च रोजी ७ उमेदवारांनी एकूण ११ नामनिर्देशनपत्र दाखल केले, तर आज १६ इच्छुकांनी अर्ज नेले.भाजप महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी पमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे,डॉ.अशोक जिवतोडे,हंसराज अहीर आदी मान्यवर उपस्थित होते.

## अकोला पश्चिमची पोटनिवडणूक रद्द;हायकोर्टाचा निर्णय

**अकोला:-** देशातील २६ विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणुका घेण्यात येणार आहेत. पैकी अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक हायकोर्टाने रद्द केली आहे.माजी राज्यमंत्री तथा विधानसभेत सहा वेळा अकोल्याचे प्रतिनिधित्व केलेले आमदार गोवर्धन शर्मा यांचे काही महिन्यांपूवी निधन झाले होते. तेव्हापासून अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघ रिक्त होता. या जागेसाठी लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दुसक्षवया टप्प्यावेळी म्हणजेच २६ एप्रिल रोजी मतदान पार पडणार होते.लोकसभा झाल्यानंतर लगेचच पावसाळा संपला की महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक लागणार आहे. यामुळे एक वर्षापेक्षा कमी कार्यकाळ बाकी असल्यामुळे हायकोर्टाने ही पोटनिवडणूक रद्द केली आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी गोळ्या सेवन करुन केले हत्तीरोग दुरीकरण मोहिमेचे जिल्हास्तरीय उदघाटन

### हत्तीरोग दुरीकरणासाठी डीईसी गोळ्यांचे सेवन करा-डीएचओ

**गोंदिया :** जिल्ह्यातून हत्तीपाय रोगाबाबतची विकृती कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत २६ मार्च ते ५ एप्रिल २०२४ दरम्यान सामुदायिक औषधोपचार मोहीम गोंदिया, तिरोडा, गोरेगाव व अर्जुनी मोरगाव या तालुक्यात राबवली जात असून लोकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांसमोर गोळ्यांचे सेवन केल्याने हत्तीरोगाचा प्रतिबंध होऊ शकतो. त्यामुळे हत्तीरोग प्रतिबंधात्मक गोळ्यांचे सेवन करुन सुरक्षीत रहा, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आज हत्तीरोग दुरीकरण मोहिमेचे जिल्हास्तरीय उद्घाटन जिल्हाधिका?ऱ्यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी श्री. नायर बोलत होते. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे व अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कापसे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, जिल्ह्यात २०२३ च्या सर्व्हेक्षणानुसार ७३३ हत्तीपाय रुग्ण तसेच ५६२ अंडवृध्दी रुग्णांची नोंद झालेली आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या २०२३ च्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रिटास एडीशनल एमएफ सर्वेक्षणात अयशस्वी ठरलेल्या गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा, गोरेगाव व अर्जुनी मोरगाव या चार तालुक्यात २६ मार्च ते ५ एप्रिल २०२४ पर्यत हत्तीरोग सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येत आहे. हत्तीरोग हा डासांपासून होणारा रोग आहे. या रोगात रुग्णांचे पाय आकाराने जाड होतात व रुग्णास हालचाल करणे अवघड जाते. हत्तीरोगामुळे शरीर विद्रुप होऊन अकार्यक्षम होतो. हत्तीरोग क्युलेक्स विचकी फॅसिएटस नावाच्या जंतूमुळे होतो, हे जंतू डासांच्या चाव्याद्वारे पसरतात. निरोगी व्यक्तीस डास चावल्यामुळे संक्रमण होते. हत्तीरोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आरोग्य विभागातर्फे मोहीम राबवून डी.ई.सी. व अल्बेंडाझॉल गोळ्यांचे वितरण करण्यात येत आहे. घरी आलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांकडून प्राप्त गोळ्यांचे सेवन त्यांच्या समक्ष करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

हत्तीरोग झाल्यावर त्यावर कोणताही परिणामकारक उपाय नाही. त्यामुळे हत्तीरोग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सामुदायिक औषधोपचार मोहिम दरम्यान डी.ई.सी. व अल्बेंडाझॉल गोळ्यांचे सेवन करणे आवश्यक आहे. आरोग्य विभागामार्फत २६ मार्च ते ५ एप्रिल २०२४ दरम्यान सामुदायिक औषधोपचार मोहीम गोंदिया, तिरोडा, गोरेगाव व अर्जुनी मोरगाव तालुक्यात राबविली जात आहे. डी.ई.सी. व अल्बेंडाझॉल गोळ्या खाल्ल्यामुळेच हत्तीरोगास प्रतिबंध होऊ शकतो. घरी आलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांसमोरच गोळ्यांचे सेवन करावे. हत्तीरोग जीवघेणा



आजार नसला तरी शरिराला विकृती निर्माण करुन कायमचे अपंगत्व होणारा आजार आहे. डी.ई.सी. व अल्बेंडाझॉल गोळ्या सुरक्षीत असून नागरिकांनी कुठलाही गैरसमज, संकोच न बाळगता गोळ्यांचे सेवन करावे. या मोहिमेदरम्यान आरोग्य कर्मचारी दोन प्रकारच्या गोळ्या देणार आहेत. डी.ई.सी. गोळी वयोमानानुसार व अल्बेंडाझॉल ही गोळी प्रत्येकी एक याप्रमाणे देण्यात येणार आहे.

या गोळ्यांचे सेवन दोन वर्षाखालील बालकांनी, गरोदर मातांनी आणि अती गंभीर आजारी व्यक्तींनी सेवन करु नये. गोळ्या उपाशी पोटी खाऊ नये, जेवण झाल्यानंतरच सदर गोळ्यांचे सेवन करावे असे जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण यांनी सांगितले.

यावेळी मंदा आनंद नागरीकर, मालनबाई भिकाजी बनकर व सिताराम गणपत सोनवाणे या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते एमएमडीपी किट वाटप करण्यात आली. तसेच हत्तीपाय आजाराबाबत जनजागृती साहित्यांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बी.डी. जायसवाल, जि.प.चे जिल्हा आयईसी अधिकारी प्रशांत खरात व इतर विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

## ओबीसी वसतिगृहाला साहित्यपुरवठा नाहीच

### ओबीसी विद्यार्थ्यांचा वसतिगृह प्रवेश लांबणीवर; व्हॅलीडीटीचाही अडथळा

**गोंदिया :** ओबीसी विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशाची प्रक्रिया प्रशासकीय स्तरावरुन सुरू झाली. शहरातील गणेशनगर आणि कुडवा येथे भाड्याने इमारती घेण्यात आल्या. मात्र, शासनाने अद्याप साहित्यपुरवठा केला नाही. त्यामुळे ओबीसी विद्यार्थ्यांचा वसतिगृह प्रवेश लांबणीवर पडला आहे. यातही व्हॅलीडीटीचा अडथळा अजून कायम आहे.

ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समाज शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. वसतिगृहाची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना शहरात उच्च शिक्षणासाठी भाड्याने खोली घेऊन राहावे लागते. यात आर्थिक फटका सहन करावा लागतो. परिणामी, उच्च शिक्षणाची आवड असतानाही गरीबांची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. तथापि, विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी ओबीसी संघटनांनी सामाजिक न्याय विभागाप्रमाणे ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहांचा आग्रह धरला. याची दखल घेत २०२२ च्या हिवाळी अधिवेशनात राज्यातील सर्व जिल्ह्यांत मुला-मुलींसाठी प्रत्येकी शंभर विद्यार्थी क्षमतेचे दोन वसतिगृह सुरू करण्याची घोषणा सरकारने केली. भाड्याने इमारती घेऊन वसतिगृह सुरू करायचे असल्याने ८ मे २०२३ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले. या प्रस्तावांना मान्यता मिळण्यात दिरंगाई झाली. नंतर २०२३ मध्ये पावसाळी अधिवेशनात ओबीसी कल्याणमंत्री अतुल सावे



**आमच्याकडून प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. जितक्या लवकर वसतिगृह सुरू करता येतील, तितक्या लवकर सुरूकरण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून आल्या आहेत. मात्र, शासनस्तरावरून अद्याप साहित्यपुरवठा करण्यात आला नाही. त्यामुळे ही प्रक्रिया लांबणीवर पडली आहे.**

**-विनोद मोहतुरे, सहायक आयुक्त, समाजकल्याण, गोंदिया.**

यांनी १५ ऑगस्टपर्यंत वसतिगृह सुरू होतील, असे आश्वासन दिले होते. नंतर नागपुरातील हिवाळी अधिवेशनात १८ डिसेंबर २०२३ ला महिनाभरात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. मात्र, 'तारीख पे तारीख' देऊन सरकार वसतिगृहाचा मुद्दा रेंगाळत ठेवत होते.

सातत्याने ओबीसी संघटना व प्रसारमाध्यमांनी लक्ष वेधल्यानंतर ओबीसी कल्याण विभागाने पत्र काढून ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेशाकरिता ऑफलाइन अर्ज मागविले. ५ मार्चपर्यंत अर्ज सादर करण्यासाठी मुदत दिली. त्यानुसार, प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली. प्रवेशासाठी लागणारी प्रक्रिया सुरू केली.

शहराच्या गणेशनगर येथे मुलींसाठी, तर कुडवा येथे मुलांसाठी भाड्याने इमारती घेतल्या. परंतु, या इमारती केवळ देखावा ठरल्या आहेत. शासनाने अद्याप साहित्यपुरवठा केला नाही. हा पुरवठा केव्हा होईल आणि इमारती विद्यार्थ्यांना राहण्यायोग्य केव्हा होतील, हे यंत्रणेला अद्याप ठाऊक नाही. सोबतच वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हॅलीडीटीची अट ठेवण्यात आली आहे. हा अथडळा अजूनही कायम आहे. तथापि, वसतिगृह प्रवेशासाठी मुलींचे ४७, तर मुलांचे जवळपास ३२ अर्ज प्राप्त झाले आहे. हे अर्ज कार्यालयातील कपाटात ठेवण्यापुरते मर्यादीत राहू नये,अशीच इच्छा ओबीसी संघटनांनी व्यक्त केली आहे.

## संपादकीय

# युवा वर्ग:लोकशाहीचे भाग्यविधाते

देशात परिवर्तन घडवायचे असेल तर युवा वर्गाचे मत निर्णायक असते, हे लक्षात घेऊनच भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी "मन की बात' या कार्यक्रमात पहिल्यांदा मतदान करणाऱ्या युवा वर्गाला संबोधित केले. "मेरा पहला वोट, देश के लिए' हे अभियान निवडणूक आयोगाने सुरू केले. त्याचा दाखला देत प्रधानमंत्री मोदींनी युवा वर्गाने मतदान प्रक्रियेत सामील व्हावे, यासाठी आवाहन केले. देशाच्या युवा वर्गाविषयी आपल्याला अभिमान आहे आणि देशात परिवर्तन व्हावे म्हणून युवा वर्गाने मतदान केले पाहिजे, असे मत त्यांनी मांडले.

निवडणूक आयोगाने सुरूकेलेली ही मोहीम महत्त्वाची आहे. शिक्षण मंत्रालयही ही मोहीम युवा वर्गापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील आहे. गाणी, पथनाट्ये, व्हीडिओ अशा विविध माध्यमांतून युवा वर्गाला मतदानासाठी साद घातली जात आहे. निवडणूक आयोगाने दोन योजना राबवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या विशेष उल्लेखनीय आहेत. पहिली विशेष योजना आहे ती युवा वर्गाच्या आगाऊ नोंदणीची (ॲडव्हान्स रजिस्ट्रेशन) व्यवस्था. ज्यांचे वय १६-१७ आहे त्यांचीही आधीच नोंदणी करण्याचा उपक्रम आयोगाने हाती घेतला होता जेणेकरुन वय वर्षे १८ पूर्ण होताच आयोग त्यांना सूचित करुन त्यांच्या नोंदणीवर शिक्कामोर्तब करेल. या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर नोंदणी करण्याचे आयोगाचे लक्ष्य होते.

दुसरी विशेष योजना निवडणूक आयोगाने राबवली ती निवडणुकीय साक्षरता मंडळ (इलेक्टोरल लिटरसी क्लब) स्थापन करण्याची. अशी मंडळं शाळा आणि महाविद्यालयात स्थापन केली गेली. १४ ते १७ वयोगटातील शाळेतील विद्यार्थी तर १८ ते २१ वयोगटातील महाविद्यालयातले विद्यार्थी यांना निवडणूक प्रक्रिया समजावी, हा या उपक्रमाचा उद्देश होता. या वयोगटाला निवडणूक साक्षर करण्यासाठी निवडणूक आयोगाने पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत. यामध्ये प्रत्यक्ष कृतीतून शिकता येईल असे उपक्रम आखले गेले. तसेच निवडणूक प्रक्रियेविषयी जागरुकता वाढावी म्हणून ६ गेम्स तयार केले. अशा उपक्रमांमधून नव्या मतदारांपर्यंत पोहोचण्याचा आणि त्यांना जागरुक करण्याचा आयोगाचा हा लक्षवेधी उपक्रम आहे.

हा सगळा खटाटोप निवडणुकीत युवा मतदारांचा सहभाग वाढावा म्हणून केला जात आहे. कोणत्याही देशातील लोकशाहीसाठी मुक्त आणि खुल्या वातावरणात निवडणुका पार पडणे जरूरीचे असते. या निवडणुकांमध्ये अधिकाधिक लोकांचा सहभाग असतो तेव्हाच प्रातिनिधिक लोकशाहीचा प्रवास सहभागी लोकशाहीकडे होऊ शकतो. या प्रवासात युवा वर्ग सर्वांत महत्त्वाचा कारण वेगळा विचार करण्याची क्षमता युवा वर्गात असते. कोणत्याही काळाचे कर्णधारपद युवा वर्गाकडे असते. भारताच्या इतिहासातले मोठे बदल हे युवा वर्गाने घडवले आहेत. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांनी ब्रिटिश सरकारच्या जुलमी शासनाच्या विरोधात एल्गार पुकारला होता. १९७० च्या दशकात इंदिरा गांधी यांच्या एकाधिकारशाहीच्या विरोधात तरुणांनीच आंदोलन केले होते. जुलुम शाही असो की एकाधिकारशाही, तरुणच त्याला विरोध करू शकतात आणि परिवर्तन आणू शकतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

त्यामुळेच युवा वर्गाने मतदानाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. देशाची दिशा आणि दशा काय असणार हे ठरवण्याचा अधिकार मतदानाच्या माध्यमातून प्रत्येकाला मिळतो. युवा वर्गाने ड्रायविंग सीटवर बसले पाहिजे कारण त्यातून देशाचे तरुण कोणत्या दिशेने जाणार याचा सुकाणू त्यांच्या हाती येतो. मतदान हे जसे कर्तव्य आहे तसेच ते जबाबदारीचे काम आहे. मतदान करणे म्हणजे निवड करणे. "अ' उमेदवार चांगला की "ब' उमेदवार चांगला एवढी ती मर्यादित निवड नसते. देशातल्या लोकशाहीचा व्यापक पातळीवर विचार करून मतदान करणे हे जबाबदारीचे काम आहे. त्यासाठी विवेकी विचार करणे जरूरीचे. विवेकी विचारांमधूनच चांगल्या-वाईटाची पारख करता येते. ती करता येण्यासाठी सजग असण्याची आवश्यकता असते.

आजच्या सोशल मीडियाच्या काळात व्हॉटस्ॲपवर माहितीचा पूर येतो मात्र ती माहिती योग्य आहे की नाही, हे तपासून घेतले पाहिजे. प्रेस इन्फॉर्मेशन ब्यूरोने माहिती तपासून घेण्यासाठी एक कक्ष स्थापन केला आहे. अल्टन्यूज, बूमफॅक्टचेक अशा काही संकेतस्थळांवरही आपल्याला योग्य माहिती मिळू शकते. आपल्याला हव्या त्या पक्षाला, उमेदवाराला आपण मतदान करू शकतो मात्र आपले मत हे अफवांवर नव्हे तर तथ्यांवर आणि सत्यावर आधारित असायला हवे.

यासाठीच "मेरा पहला वोट देश के लिए' या घोषणेवर आधारित एक गाणे भारत सरकारने प्रसिद्ध केले आहे. या गाण्यात म्हटले आहे मतदान म्हणजे स्वातंत्र्याचा पुरस्कार आणि लोकशाहीचा पहिला संस्कार. त्यामुळे भारतात लोकशाही टिकवायची असेल तर युवा वर्गाने मतदान केले पाहिजे. यंदा पहिल्यांदा मतदान करणाऱ्या युवा वर्गाची संख्या एक कोटी ८५ लाख इतकी आहे, असे निवडणूक आयोगाने सांगितले आहे. शिवाय सध्या भारताचे सरासरी वय २५ ते ३० च्या दरम्यान आहे. त्यामुळे युवा वर्गाचे मत निर्णायक असणार आहे. अठराव्या लोकसभा निवडणुकीत अठरा वर्षे पूर्ण असलेल्या प्रत्येकाने मतदान केले पाहिजे.

अठरा हे मतदानाचे वय करण्याचा निर्णय राजीव गांधी प्रधानमंत्री असताना १९८८ साली ६१ वी घटनादुरुस्ती करुन घेण्यात आला. याचे मोल खूप अधिक आहे. त्यामुळे आता देशाचे भविष्य बदलण्याची संधी युवा वर्गाच्या हातात आहे. देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना युवा वर्गाने स्वातंत्र्याचे अमृत पिऊन लोकशाहीला संजीवनी दिली पाहिजे. युवा वगा;ने मोठ्या प्रमाणावर योग्य मतदान केले तरच ते नव्या भारताचे भाग्यविधाते ठरू शकतात. त्यासाठी भविष्याची निवड विवेकी पद्धतीने केली पाहिजे.

**डॉ. श्रीरंजन आवटे**

# शासनाच्या मिळत नसलेल्या योजनांची नागरिकांनी केली होळी

**आमगाव :-** नागरीकांना मागील दहा वर्षांपासून राज्य शासनाच्या एकही योजनेचा लाभ मिळाला नाही.तर राज्य शासनाच्या वतीने न्यायप्रविष्ठ प्रकरण निकाली काढले नाही, यामुळे नागरिकांनी आक्रोश वेक्त करीत सरळ शासनाच्या मिळत नसलेल्या योजनांची होळीच नागरिकांनी केली.

राज्य सरकारने नगर पंचायत ते नगर परिषदचा वाद मिटवता आला नाही .सवीच्य न्यायालयात याबाबद पीटिशन अपील करून निर्णय घेता आले नाही ,त्यामुळे नागरीकांना मागील दहा वर्षांपासून विकास योजनेपासून वंचित व्हावे लागत आहे.शासनाचे दहा वर्ष लोटूनही शासनाच्या योजनांचे एकही लाभार्थी नाही अशी परिस्थिती आठ गावात निर्माण झाली आहे.आता हा विषय नागरिकांनी पेटऊन घेत निर्णय नाही तर मतदान नाही अशी भूमिका घेतली आहे.

नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया घेऊन नगर परिषद संघर्ष समितीच्या माध्यमाने निर्धार करून सरळ देशात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. २४ मार्चला होळी सण निमित्त बनगाव येथे द्वारीका, यशवंत नगर तर माल्ही येथील श्रीराम टोली येथे नागरीकांनी योजना नाही तर मतदान नाही असे घोषवाक्य देत मतदानाचा बहिष्कारची भूमिका घेतली.तर शासनाच्या मिळत नसलेल्या योजना फलकांच्या सह होळी दहन केले.यावेळी संघर्ष समितीचे यशवंत मानकर,उत्तम नंदेश्वर,रवी श्रीसागर, गजानन भांडारकर,मोरेश्वर पटले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले .

२०१४ पासून नगर पंचायत ते नगर परिषदचा विषय राज्य सरकारला योग्यपणे हाताळता आले नाही त्यामुळे अद्यापही हा विषय सवीच्य न्यायालयात प्रलंबित आहे.त्यामुळे नागरीकांना घरकुल योजना सह एकूण योजनेचा लाभ हा शून्य ठरला आहे.

नगर परिषद संघर्ष समितीच्या पुढाकाराने आता हा विषय आक्रमक पवित्रा घेत नागरिक हितासाठी सरळ होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेण्यात आले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शिक्षकांची गळचेपी करणारा शासन निर्णय रद्द करा-आमदार सुधाकर अडबाले

## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने तीव्र आंदोलन करणार

**गोंदिया :** शालेय शिक्षण विभागाने संचमान्यतेचे सुधारित निकष निश्चित केले असून त्याबाबत नुकताच शासन निर्णय निर्गमित केला आहे. मात्र, या शासन निर्णयामधील प्रस्तावित बाबींमुळे मोठ्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याने सदर शासन निर्णय रद्द करावा, अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी केली आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या १५ मार्च २०२४ रोजी निर्गमित शासन निर्णयात राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना १ ते २० पटसंख्येपर्यंतच्या शाळांना आता किमान एक शिक्षक दिला जाणार आहे. आवश्यकतेनुसार दुसऱ्या पदांवर सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती केली जाईल. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेसाठी मुख्याध्यापक पद कायम ठेवण्यासाठी १५० विद्यार्थी पटसंख्येचा निकष ठेवण्यात आला आहे. तर २८ ऑगस्ट २०१५ च्या शासन निर्णयात प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक पदास १५० तर उच्च प्राथमिक शाळेत १०० पेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय होते.

सहावी ते आठवीला ३५ विद्यार्थ्यांमागे शिक्षकाचे एक पद देय राहील. तसेच या विद्यार्थिसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजे किमान १८ विद्यार्थी असल्यास पुढील पद देय होईल. नव्याने पद मंजूर होण्यासाठी नमूद विद्यार्थी संख्या असणे आवश्यक असेल. तसेच विद्यार्थी संख्या कमी झाल्यास संरक्षित असलेले मंजूर पद कमी होईल. नववी आणि दहावीसाठी ४० विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे. या गटात २२० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असल्यास नवीन पद देय होण्यासाठी आवश्यक ४० विद्यार्थी संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे किमान २१ विद्यार्थी असल्यास नवीन पद देय होईल.

मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक पदे माध्यमिक शाळांबाबत इयत्ता १ ते ५ ते इ. १० वी, किंवा इ. १२ वी आणि इ. ८ वी ते इ. १० वी किंवा १२ वी मुख्याध्यापक पद हे किमान १५० विद्यार्थी संख्येवर मंजुर करण्यात येईल. उपमुख्याध्यापक पद हे ३१ शिक्षक पटसंख्या असल्यास व पर्यवेक्षक पद हे १६ ते ४६ शिक्षक पदसंख्या असल्यास मंजुर करण्यात येईल. तर २८ ऑगस्?ट २०१५ च्या शासन निर्णयात माध्यमिक शाळेतील (वर्ग ९ व १० वी) मुख्याध्यापक पदास १०० पेक्षा अधिक विद्यार्थी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय होते.

पटसंख्येच्या निकषावरच मुख्याध्यापकाचे पद अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना त्या-त्या व्यवस्थापनाच्या अन्य शाळांमध्ये समायोजित करावे. पूर्ण जिल्ह्यात किंवा त्याच व्यवस्थापनाच्या कार्यक्षेत्रात मुख्याध्यापक अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना शिक्षकांच्या रिक्त पदांमध्ये रिक्त जागेवर समायोजित करावे, अशी तरतुद करण्यात आली आहे. मात्र, त्याचवेळी उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक पदे कमी होत असल्यास उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक पदावर मान्यताप्राप्त कर्मचारी कार्यरत असल्यास त्याचे संस्थेअंतर्गत समायोजन होईल. समायोजनासाठी पद रिक्त नसल्यास सेवानिवृत्त होईपर्यंत सदर पदावर संरक्षण राहिल. विशेष शिक्षक माध्यमिक शाळा संवर्गात इयत्ता १ ली ते १० वीसाठी २५१ ते ५०० विद्यार्थी संख्येवर १ क्रीडा शिक्षक पद मंजूर राहिल. इ. ८ वी ते १० पर्यत शाळांवरील १५१ ते ५०० पटसंख्येपर्यंत १ क्रीडा शिक्षक पद मंजूर करण्यात येईल.



**या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त ठरणार आहे. अनेक मुख्याध्यापकांना शिक्षकपदी समायोजित व्हावे लागणार आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्याचे उल्लंघन करणारा या निर्णय तात्काळ रद्द करावा अन्यथा विमाशि संघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**

**- सुधाकर अडबाले**
**आमदार, नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ**

गंभीर बाब म्हणजे, ज्या शाळांना कार्यभार अभावी विशेष शिक्षक मंजूर होणार नाहीत अशा शाळांमध्ये नजिकच्या शाळांतील विशेष शिक्षकांचे मॅपींग करुन उपलब्ध करुन देण्यात येईल. याचा अर्थ शिक्षक भटकंती करतील. जिल्हा परिषद शाळांसाठी विशेष शिक्षकांच्या अनुषंगाने गट स्तरावर दोन तर केंद्रस्तरावर एक क्रीडा शिक्षक उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच अनुज्ञेय होणारी शिक्षकांची पदे राज्याच्या पायाभूत पदांच्या मर्यादेत मंजूर केली जातील.

हा शासन निर्णय शिक्षकांवर अन्याय करणारा असून शिक्षकांची गळचेपी करणारा असाच आहे. हा शासन निर्णय शासनाने तात्काळ रद्द करावा, अन्यथा विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आमदार सुधाकर अडबाले यांना दिला आहे.

# १ पिस्टलसह जीवंत काडतूस, ५ तलवारी, १ गुप्ती जप्त

**गोंदिया:** आगामी लोकसभा निवडणूक व सन-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गोंदिया जिल्हा पोलिसांचे २३ व २४ मार्च दरम्यान कोंबिंग ऑपरेशन राबविले. यात १ पिस्टल, १ जीवंत काडतूस, ५ तलवारी, १ गुप्ती जप्त करुन अवैध दारु ५२, जुगार २ व ५६ अवैध कृत्य करणाऱ्यावर अवैध कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांवर केली प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा व गोंदियाच्या उपविभागीय पोलिस अधिकारी रोहिणी बानकर यांच्या मार्गदर्शनात कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखा, शहर पोलिस, रामनगर पोलिस व ग्रामीण पोलिस, सी ६० पथकाने हे ऑपरेशन राबविले. शहरात




पोलिस निरीक्षक दिनेश लबाडे, पोलिस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या नेतृत्वात पैकनटोली, गौतमनगर, कुंभारेनगर, सावराटोली, छोटा गोंदिया, रामनगर, कुडवा, जब्बारटोला या परिसरातील रेकॉर्डवरील व सर्व सराईत गुन्हेगारांची चौकशी करुन त्यांच्या घराची झाडाझडती घेतली. यादरम्यान पैकनटोली येथे अतिश संतोष करोसीया (३०) यांच्या घरातून ३ जुन्या तलवारी, वॉर्ड क्र. १ मध्ये कांतीलाल सुरजलाल ढोमणे (४६) याच्या घरातून १ लोखंडी तलवा व १ गुप्ती, वाजपेयी वॉर्डामध्ये शुभम पुरुषोत्तम हरदीये (२५) याच्या घरातून १ी पिस्टल मॅग्जीनसह व १ जीवंत काडतूस, पैकनटोली येथे पंकज कुमार चंद्रप्रकाश उर्फ संतोष आग्रे (१९) याच्या घरातून लोखंडी तलवार असे एकूण ५३ हजार ७३० रुपये किमतीचे शस्त्रे जप्त केली.

तसेच जिल्ह्यातील पोलिस ठाण्यातंर्गत अवैध दारुबंदी कायद्यानवे ५२ जणांवर कारवाया, एनडीपीएस कायद्यातंर्गत २, जुगार कायद्यातंर्गत २ कारवाया करुन ३ लाख ७४ हजार ९७४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे अवैध कृती करणाऱ्यांविरुध्द कलम ११० अंतर्गत ३ कारवाया, कलम ९३ अंतर्गत १२ जणांवर कारवाई, कलम ११०, ११२, ११७ मपोकाअंतर्गत १ कारवाई व कलम १०७ अंतर्गत ४० जणांवर कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे शहर व जिल्ह्यातील गुन्हेगार व गावगुंडांचे धाबे दणाणले आहे.

# महिला आरक्षण मध्ये अर्ज करण्यासाठी महिला उमेदवारांना सहन करावा लागतो दुबार आर्थिक भुर्दड

**विष्णू वैरागडे**

**गडचिरोली:** खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानीत संस्थांकडे ठेवण्यात आलेल्या ३०% टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती गटात अर्थात नॉन क्रिमिलेअर मध्ये मोडत नसल्याबाबत महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभागचे शासन निर्णय क्र महिआ २०२३/प्र.क.१२३/कार्या-२ दिनांक ४ मे २०२३ अन्वये खुल्या प्रवर्गतील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आली आहे. मात्र सध्या महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेतील अर्जामध्ये "महिला आरक्षण" पर्याय अद्याप असुन या पर्यायाची पुर्तता केल्याशिवाय पुढे जाताच येत नसल्याने एकीकडे शासनाने ही अट केव्हाच रद्द केली असताना पोलीस भरती प्रक्रियेत ही अट कायम असल्याने महिला उमेदवारांमध्ये मोठी अडचण निर्माण झाली आहे.



सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र पोलीस भरतीचे अर्ज सादर करताना महिला उमेदवारांनी महिला आरक्षण होय निवडल्यास त्यांना संबंधित प्रमाणपत्राचा क्रमांक आणि प्रमाणपत्र जारी केल्याचे तारीख टाकावी लागत आहे. त्यामुळे ज्या महिला उमेदवारांकडे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने उमेदवारांनी महिला आरक्षण "नाही" चा पर्याय निवडून अर्ज सादर केले व आवश्यक ३५०/- रुपये शुल्क देखील भरले. परंतु आता पोलीस भरती प्रक्रियेतील पोर्टल वर महिला आरक्षण प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक टाकण्याची अट काढून टाकले असल्याने पुर्वी सादर केलेल्या महिला उमेदवारांना आधी केलेला अर्ज रद्द करुन नंतर नवीन अर्जात महिला आरक्षण "होय"चा पर्याय निवडून नव्याने पुन्हा ३५०/- दुबार अतिरिक्त शुल्क भरावे लागत आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च असुन अतिदुर्गम गडचिरोली जिल्ह्यातील महिला उमेदवार आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या असल्याने आधीच्या जुन्या अर्जामध्ये सरसकट दुरुस्तीची सवलत उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी महिला उमेदवारांकडून केली जात आहे. याबाबत पोलीस अधीक्षक श्री निलोत्पल यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# शाकाहारी जेवन १६०, तर चहा १०, कॉफी १५ रूपयांची

**गोंदिया:** लोकसभा निवडणूक काळात निवडणूक आयोगाने विविध बाबींवर खर्च करण्यारच्या रकमेची मर्यादा निश्चित केली आहे. आयोगाची या खर्चावर नजर राहणार असून त्याचा तपशील निवडणूक विभागाने जाहीर केला. गत लोकसभा निवडणुकीपेक्षा यंदाचे खर्चाचे दर १० ते १२ टक्क्यांनी वाढविण्यात आले आहेत. यात शाकाहारी जेवनासाठी आता ११२ ऐवजी १६० रुपये तर सामिष शाळीसाठी २५० रुपये दर निश्चित करण्यात आले आहेत. लस्सी, चहा, कॉफील कोल्ड्रींक्स, नाश्त्याचे दरही वाढविण्यात आले आहेत.

मर्यादा निश्चित कन दिली जाते. त्यामुळे उमेदवाराला प्रत्येक खर्च दररोज निवडणूक विभागाला विहित नमुन्यात सादर करावा लागणार आहे. त्याकरिता कोणत्या बाबींवर किती खर्च करायचा याचे दरही ठरवून देण्यात आले आहेत. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधी सोबत चर्चा करुन प्रत्येक दर निश्चित करण्यात आले आहेत. गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयातील याबाबत अलीकडेच बैठक घेण्यात आली. यात हे दर निश्चित करण्यात आले. निवडणूक सनियंत्रण कक्षाच्या माध्यमातून उमेदवारांच्या खर्चावर लक्ष ठेवले जाते. उमेदवाराने सादर केलेला खर्च आणि निवडणूक आयोगाच्या यंत्रणेने नोंदविलेला खर्च या दोन्हीची पडताळणी केली



जाते. जात उमेदवाराने कमी खर्च दाखविल्यास त्यांना नोटीस पाठवून कारवाई केली जाते. या खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक तैनात असणार आहे. प्रचार सभांचे व्हिडीओ शुटिंग केले जाईल.

# ४० वर्षीय इसमाची गळफास लावून आत्महत्या

**अर्जुनी मोर.**-तालुक्यातील मोरगाव येथे मृत्यूचे थैमान थांबावयाचे नाव घेत नाही. आज तारीख २६ मार्चला दुपारी देवीलाल सदाशिव कुंभरे वय ४० वर्ष यांनी आपले राहते घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उजेडात आली आहे. मोरगाव येथे आठवड्याभरापासून अकाली व दुर्दैवी मृत्युने थैमान घातले आहे. ऐन होळीच्या सप्ताहात मोरगाव येथे मृत्यूचे तांडव निर्माण झाल्याने गावात शोककळा पसरली असून चिंतेचे वातावरण निर्माण आहे. मोरगाव येथे विविध घटनांमध्ये मागील २१ मार्च ते २४ मार्च पर्यंत पाच जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली होती.

# लोकसभा उमेदवार कसा असावा?

निवडणूक म्हणजे राजकीय जत्रा. परंतु या राजकीय जत्रेत देशाला व्यवस्था देणारी, सामाजिक व आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडून पाठविलेल्या उमेदवाराला ही एक सुवर्णसंधी असते. ज्या संधीचे सोने करणे हे समाजाचे कर्तव्य असते. या जत्रेतून एक लोकशाही संसदीय प्रणाली विकसित होते. संसदेमध्ये देश हिताचे निर्णय, शेतकरी-शेतमजूर हिताचे निर्णय, कौटुंबिक समस्येचे निर्णय व देश सुरक्षित ठेवण्याचे निर्णय आणि बाहेरील आक्रमणे हटविण्याचे निर्णय घेणारी संसद ही एक प्रचंड शक्तिशाली महासत्ता असते. ती एक सामाजिक निर्णय घेणारी प्रक्रिया असते. या निर्णयात देश व देशांतर्गत व्यवस्था भरडल्या जाणार नाही, याचा सांगोपांग विचार केला जातो. संसद म्हणजे काही नट नट्या निवडून पाठविण्याचे केंद्रस्थान नाही, तर क्रिकेटपटू निवडून पाठविण्याचे सुद्धा केंद्र नाही, हॉटेल वाले, ऑटो वाले, आपल्या जातीचे, धर्माचे, आपल्या समाजाचे, आपल्या भाऊबंदकीतील उमेदवार पाठविणे गरजेचे नसते, तर ज्या उमेदवाराला सामाजिक, भौतिक व आर्थिक, जागतिक पातळीवरील घडामोडीचा व देशातील अंतर्गत सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास असेल त्यांचीच तिथे गरज असते.

पण आजची परिस्थिती पाहता जातीचे, धर्माचे, बिनडोक पणाचे खासदार होऊन, रबरी स्टॅम्प उमेदवार असावा, अशीच भूमिका आजपर्यंतच्या सर्वच राजकीय पक्षांनी घेतलेली आहे. आज पर्यंतचे अनेक धोरणे हे काही प्रमाणात सामाजिक व्यवस्थेला धरून असली, तरी ती जाती, धर्मावर आधारित व्यवस्था तयार केल्या जात आहे. आणि जे राजकीय पक्ष स्वतःच्या सोयीचे राजकारण करत असेल तर तेच नक्की सामान्य माणसासाठी घातक असते. आणि अशा या घातक राज्यात सर्वसामान्यांचे हित जोपासले जात नाही तर स्वहिताची हुकूमशाही वाटचाल चालू होते. आज शहरी आणि ग्रामीण ही व्यवस्था अलग अलग दुभंगल्या गेली आहे.

ग्रामीण व्यवस्थेचा विचार फक्त लुटून शहराकडे वाटचाल करावी, ग्रामव्यवस्थेचे लचके तोडले गेले आहेत व त्यातूनच ग्रामीण भागाचे शोषण करुन शहरी विकास घडावा ही वाटचाल सतत गेल्या ७५ वर्षापासून चालू आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोंढे शहराकडे वाढत आहे. शहरी मतदान वाढून लोकसंख्येत भर पडत आहे. व शहरी आमदार-खासदार वाढून सत्ता काबीज केल्या जात आहे. अशी ही राजकीय पक्षाची स्वारथी व्यवस्था अतिशय चुकीची आहेत. गेली ७५ वर्षात ग्रामीण व्यवस्थेला तडा देऊन शेतकरी जीवन संपवीण्याचे उद्योग सुरूझालेत.

आज शेती आणि शेतकरी हे विषय वेगवेगळे आहेत. आणि हे सर्व जातीचे राजकारण पसरवून शेतकरी समाजातील जात हेरुन , त्यामध्ये फूट पाडून सर्वच राजकीय पक्षांनी संधी साधू राजकारण केले आहे. ज्या आर्थिक, सामाजिक व जागतिक धोरणाचा त्या आमदार खासदाराला जर अभ्यास नसेल तर आपल्या घरातला, आपल्या जातीतला, आपल्या संपर्कातला उमेदवार पाठवून काय साध्य झाले ? आणि आतापर्यंत जनतेने हेच केले आहे? तर जाती-जातीत भांडणे लावून विध्वंसक कारवाया तयार झाल्यात व त्याचे फायदे जातीचे पक्ष चालवणाऱ्यांना झाला. म्हणूनच लोकसभा निवडणुकीत जाती-धर्माचे राजकारण होऊ नये संसद ही काही संस्कृतिक मंडळ किंवा क्रिकेटचे ग्राउंड नाही. तर ती एक देशाला वाटचाल करणारी आर्थिक धोरणाची सामाजिक प्रक्रियेची लोकशाही तत्त्वावर असणारी प्रचंड शक्तीवाण महासत्ता आहे.

या महासत्तेत बकऱ्या, मेंढरं, बनून जगणाऱ्यांची आवश्यकता नसते तर तिथे एक क्रांतिकारी वैचारिक शक्तीची, ध्येयवादी विचारांची, व देशासाठी निष्ठेने काम करणारी यंत्रणा निर्माण करण्याची गरज असते. पण या व्यवस्थेला सर्वच राजकीय पक्षांनी तिलांजली दिली . म्हणजेच आजचे राजकीय कार्ये हे सामान्य जनतेच्या फायद्याचे नसून ते राजकीय स्वार्थी लोकांच्या फायद्याचे आहेत. आजपर्यंत ज्या पक्षांनी जाहीरनामे काढले, त्या पक्षांनी त्याची अंमलबजावणी किती केली हे पाहणे गरजेचे आहे. जर हे स्वतः जाहीर केलेले जाहीरनामे जर अंमलबजावणी करू शकत नसेल तर पुन्हा मतदान करणाऱ्यांची नक्कीच फसवणूक आहे. जाहीरनामे प्रसिद्ध केल्यानंतर ती जर अंमलबजावणी झाली नाही तर जनतेला सुप्रीम कोर्टात जाऊन किंवा निवडणूक आयोगाच्या विरोधात जाऊन निर्णय घेण्याची सुद्धा क्षमता नाही.

म्हणजेच आजचे राजकीय पक्षांचे जाहीरनामे हे सर्व गोड बंगाल आहे. त्यासाठी संधी साधू राजकीय पक्ष हाकलून नीतिमत्ता निर्माण करणारे, ध्येयवादी, आर्थिक धोरणे शेतकरी व इतर समाजाच्या फायद्याचे असतील व लोकशाहीचे जतन करणारे मूळ संविधानाला घेऊन चालणारी व्यवस्था असणे गरजेचे आहे. तर ती देशांतर्गत चालणाऱ्या आर्थिक धोरणाची दिशा असावी. ग्रामीण व्यवस्था हीच खरी देशांतर्गत चालणारी मूळ व्यवस्थेचे फाउंडेशन आहे. याच फाउंडेशन वर अनेक इमारती उभारले जाऊ शकते.

मूळ आर्थिक धोरणाचे फाउंडेशन कमजोर केल्यामुळे ही व्यवस्था केव्हा डबघाईस येईल, याचे काही निश्चिती नाही. बांधलेले पूल हे काही वर्षाचे व मर्यादित रस्ते असतात. मात्र जमिनीवरील रस्ता हा कायम पिढी जात असतो. शहरीकरण वाढवून जरी विकास होत असेल तरी ती ग्रामीण व्यवस्थेची लूट होऊन शहरी विकास घडतो आहे. आणि एक दिवस शहराची संख्या वाढत गेल्यावर रस्त्याने चालणे मुश्कील होणार आहे. पुढील २५ वर्षात ही व्यवस्था डबघाईस येणार आहे. सामान्य माणसाला रस्त्यावर निघणे फिरणे, वाहने चालविणे, अतिशय कठीण होईल व यातून अनेक प्रश्न निर्माण होतील. तेव्हा खऱ्या प्रगतीचा ग्रामीण विकास हाच एक मार्ग आहे. आतापर्यंत गेल्या ७५ वर्षात औद्योगिक क्रांती झाली असेल पण ती आता ग्रामीण क्रांती करणे अतिशय गरजेचे आहे. यासाठी महात्मा फुले, तुकडोजी महाराज, शरद जोशी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी यांनी आपले आयुष्य खची घातली ती व्यवस्था जनता जनार्दनाने नाकारुन, भुताटकी व्यवस्था अंगीकारली आहे.

ही जर व्यवस्था बदलली नाही तर पुढील २५ वर्षात या व्यवस्थेचे अनेक दोष रस्त्यावर आल्याशिवाय राहणार नाही आणि डोक्यावर संताप वाढवून घेतल्याशिवाय जनतेला इलाज राहणार नाही. तेव्हा लोकसभेत देश पातळीवर विचारत होणारी यंत्रणा म्हणजे संसद दे साठी सामाजिक आर्थिक व जागतिक धोरणाची माणसे निवडून पाठवा.

आतापर्यंत आपण ऑटो वाले, हॉटेल वाले मामा काका व सर्व जातीचे पक्ष निवडून पाठविले. आजच्या निवडणुकीत मंदिर-मज्जित व जाती-धर्माचे विषय नसतात. तर संसद ही देशांतर्गत व देशाबाहेरील व्यवस्था सांभाळणारी ही एक सामाजिक लोकशाहीची चळवळ आहे. निवडणूकी मध्ये जात ही निकष न ठेवता, देश हा आर्थिक धोरणावर चालतो, हा विचार करणे मतदारांना फारच गरजेचे आहे. तरच पुढील संसद व पुढील विकास हा सोनेरी अक्षरांनी लिहिल्या जाणारा काळ राहील, नाहीतर जे आतापर्यंत ७५ वर्षात भोगले तेच पुढेही भोगल्याशिवाय जनता राहणार नाही व शेतकऱ्यांच्या सतत पुढे ही आत्महत्या होत राहील.



७५ वर्षातील व्यवस्था पाहता पुढील काळ महासत्तां न बनता घनघोर रणसंग्राम, महासत्ता तयार होईल. तेव्हा येणाऱ्या निवडणुकीत जाती-पातीचा, धर्माचा प्रश्न हा मनावर न घेता, आर्थिक वाटचालीचा असावा. असाच एक प्रयोग यवतमाळ वाशिम हा लोकसभेचा आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून देशात प्रसिद्ध झाला आहे. त्या ठिकाणी मी माझी उमेदवारी (श्री धनंजय काकडे पाटील) दाखल करुन ही व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न करणार आहे. मतदार या व्यवस्थेला किती बदल घडवतील हेच या निवडणुकीत प्रत्यय येणार आहे. व असेच उमेदवार लोकसभेसाठी प्रगती कारक राहतील. अशा उमेदवारांना जनतेने स्वतःचे आर्थिक सहकार्य देऊन, वर्गणी करुन, मदत करुन पाठविण्याची हिंमत करावी लागेल, तरच हा खऱ्या अर्थाने देश महा विकास होईल. नाहीतर राजकीय पक्षश्रेष्ठीच्या दडपणात राहून, गुलामगिरीने जगणारी व्यवस्थाच पुढेही स्वीकारावी लागेल, यात तीळमात्र शंका नाही. हीच विनंती.

**धनंजय काकडे पाटील**
**९८९०३६८०५८, अध्यक्ष-**
**शेतकरी,वारकरी- कष्टकरी महासंघ**

# १०१ गावांतून जाणार नागपूर-गोंदिया द्रुतगती महामार्ग

**गोंदिया:** जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात जोडण्यासाठी नागपूर ते गोंदिया द्रुतगती (समृद्धी) मार्ग बांधकामाचा निर्णय राज्य सरकारने घेतला. या बाबत राज्यपालाच्या आदेशान्वये अधिसुचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. यानुरुप नागपूर-गोंदिया हा द्रुतगती मार्ग नागपुर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील १०१ गावशिवारातून जाणार आहे. यासाठी जवळपास ४ हजार गट क्रमाकांचीही जागाही अधिगृहित करण्यात येणार आहे. तिरोडा तालुक्याच्या मार्गाने गोंदियाला जोडणाऱ्या बालाघाट मार्गाशी जोडला जाणार आहे.

गोंदिया व नागपूर या दोन शहरांना जोडणाऱ्या आजघडीला असलेल्या मार्गाने प्रवास करतांना जवळपास ३ ते ४ तासाचा वेळ लागतो. या अंतराचा प्रवास आणखी सोयीस्कर व्हावा व गोंदिया शहरासह जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाकडून नागपूर ते गोंदिया या द्रुतगती महामार्गाचे बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला राज्यपालांकडून शिक्का मोर्तब झाला असून त्यांच्या आदेशान्वये अधिसुचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. हा मार्ग तिरोडा तालुक्यातून गोंदियाला जोडला जाणार आहे. हा मार्ग नागपूर, भंडारा व गोंदिया या तीन जिल्ह्यातील जवळपास १०१ गावशिवारातून जाणार आहे. प्रसिद्ध झालेल्या अधिसुचनेमध्ये अधिगृहित करण्यात आलेले गट क्र. व आवश्यक जमिनीचे क्षेत्रफळ नमूद करण्यात आले आहे. २०८ पानाच्या अधिसुचनेत नागपूर ते गोंदिया प्रवेश नियंत्रित शिघ्र संचार, द्रुतगती महामार्ग म्हणून संबोधण्यात आले आहे. याला राज्य महामार्ग (विशेष क्रं.७) म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे या द्रुतगती मार्गाच्या बांधकामाला गती मिळणार, असे मानले जात आहे.



### या तालुक्यातून जाणार मार्ग

**नागपूर ते गोंदिया हा द्रुतगती मार्ग नागपूर जिल्ह्यातील नागपूर, उमरेड, कुही, मौदा, भंडारा जिल्ह्यातील भंडारा, मोहाडी, गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा व गोंदिया तालुक्यातून जाणार आहे.**

### ३३ गावांची जमिन होणार अधिग्रहित

**नागपूर ते गोंदिया हा द्रुतगत मार्ग एकूण १०१ गावशिवारातून जाणार आहे. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील ३३ गावांचा समावेश आहे. तर भंडारा जिल्ह्यातील २९ गावे व नागपूर जिल्ह्यातील ३९ गावशिवारातून हा मार्ग जाणार आहे. जिल्ह्यातील गावांमध्ये तिरोडा तालुक्यातील मनोरा, केसलवाडा, येङमाकोट, पांजरा, सरांडी, उमरी, धादरी,बेलाटी बु., कवलेवाडा, चिरेखनी, भुराटोला, पालडोंगरी, कटरी बु., बेरडीपार, डब्बेटोला, सोनेगाव, नहरटोला व गोंदिया तालुक्यातील बोदा, दवनीवाडा, पिपरटोला, देऊटोला, सोनपुरी, निलागोंदी, रतनारा, लोहारा, पांढराबोडी, लईटोला, लोधीटोला, नवाटोला, घिवारी, लोधीटोला, हलबीटोला व सावरी या गावांचा समावेश आहे.**

# गटशिक्षणाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय शिक्षकांना जिल्हा परिषदेत: नो एंट्री!

**गोंदिया:-** गोंदिया जिल्हा परिषदेत नव्यानेच रुजू झालेले मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानथम यांनी गेल्या तीन चार वर्षापासून विस्कटलेली जिल्हा परिषदेची परिस्थिती सुधारण्याचा चंग बांधल्याचे दिसून येत आहे.रुजू झाल्यापासूनच त्यांनी पारदर्शक कामाला प्राधान्य दिल्याने पवित्र पोर्टल अंतर्गत आलेल्या ३९० शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या इतिहासात विना पैशाने शाळा मिळाली. तर रात्री १२ वाजेपर्यंत कार्यालयात काम करुन सर्वच विभागाचा आढावा घेत कर्मचारी व अधिकारी यांना लोकसेवक कायद्याप्रमाणे वेळेच्या आत काम करण्याचे निर्देश दिले.त्यातच २० मार्च रोजी शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या पंचायत समिती अंतर्गतच्या शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, सहा.शिक्षक व इतर कर्मचारी यांना शाळा सोडून तसेच कार्यालय सोडून बिना परवानगीने जिल्हा परिषदेच्या शिक्षण प्राथमिक विभागात येण्यास मज्जाव घालण्यात आलेला आहे.



शिक्षक व सदर कर्मचारी हे शाळेच्या व कार्यालयीन वेळेत अधिकारी कर्मचारी शिक्षण विभागात सतत येत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम पडण्याची शक्यता असल्याने यापुढे ज्या कुणाला शिक्षण विभागात यायचे असेल त्यांनी पंचायत समिती स्तरावरील गटशिक्षणाधिकारी यांची लेखी स्वरुपाची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय येऊ नये असे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम यांनी काढले आहेत.

या लेखी आदेशामुळे शिक्षण विभागात कार्यरत शिक्षकांमध्ये चांगलीच धडकी भरली असून संघटनेच्या नावावर शाळेत शैक्षणिक कार्य सोडून सातत्याने जिल्हा परिषदेच्या परिसरात फेरफटका मारणाऱ्या शिक्षकांना मात्र मुकाअच्या या आदेशाने फटका बसला आहे.

# नॉपेडचे कचरा टाके ठरले पांढरा हत्ती

**गोरेगाव:** तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतींच्या ९७ गावांत स्वच्छ भारत मिशन व मनरेगाअंतर्गत टाकाऊ कचरा टाकण्यासाठी नॉपेडचे सिमेंट, विटांद्वारे टाके तयार करण्यात आले आहेत. हे टाके नागरिकांच्या सुविधेन्वये तयार करण्यात आले नसल्याने पांढरा हत्ती ठरले आहेत.

केंद्र शासनाने गावागावांत स्वच्छता राखण्यासाठी व समृद्ध भारताची कल्पना साकार करण्यासाठी स्वच्छ भारत मिशन विभाग व मनरेगा विभागाला सिमेंट, विटांपासून नॉपेडचे टाके तयार करण्याची जवाबदारी सोपविली आहे. प्रत्येकी टाके तयार करण्यासाठी २७ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार नॉपेडचे टाके मंजूर करुन ते तयार करण्याचे कंत्राट ग्रामपंचायतींना न देता कंत्राटदारांना दिले. कंत्राटदाराने गावकऱ्यांना आवश्यक असलेल्या जागी टाके बांधकाम केले नाही. त्यामुळे गावातील केरकचरा या टाक्यात टाकला जात नाही. हा केरकचरा उघड्यावर फेकला जात आहे.



### टाके जनतेसाठी कंत्राटदाराच्या आर्थिक उन्नतीसाठी

**नॉपेडचे टाके तयार करण्यासाठी शासनाने एका टाक्यासाठी २७ हजार मंजूर केले असल्याने कंत्राट मिळवून घेण्यासाठी पदाधिकारी सरसावले आहेत. पदाधिकारी नॉपेडचे टाके तयार करीत असल्याने गावकरी शासनाची योजना समजून कामात अडथडा निर्माण करीत नाहीत. त्यामुळेच कंत्राटदार निकामी जागी कमी खर्चात टाके तयार करुन मोकळे होत आहेत. ही योजना शासनाने गावातील कचरा व्यवस्थापन व खत तयार करण्यासाढी आखली असली तरी पदाधिकारीच कंत्राट घेत असल्याने स्वयहित जोपासण्याचे काम कंत्राटदार पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या कामाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करणे आवश्यक आहे.**

**गावातील केचकचरा नागरिकांनी नॉपेडच्या टाक्यात टाकावे. या कचऱ्यापासून खत तयार करता येते. गावात स्वच्छता व पिकांना खत मिळण्यासाठी मागणीनुसार नॉपेड टाके मंजूर करुन तयार करण्यात आले आहे,**

**श्री.रहमतकर,**
**अभियंता, स्वच्छ भारत मिशन जिल्हा परिषद, गोंदिया**

# विना रजिस्ट्रेशन दवाखाना उघडला, बोगस डॉक्टरवर गोरेगावात गुन्हा दाखल

**गोंदिया:** शासन मान्यता प्राप्त वैद्यकीय परवाना नसताना (विना रजिस्ट्रेशन) गोरेगाव येथे हॉस्पिटल चालविणाऱ्या एका बोगस डॉक्टरवर २१ मार्च रोजी कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनात गोरेगाव पोलिस व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अमरीश मोहबे यांनी केली आहे.नितेश बाजपेयी असे बोगस डॉक्टरचे नाव आहे.

२१ मार्च २०२४ रोजी गोरेगाव येथील वैद्यकीय अधिक्षक यांनी गोरेगावात बोगस डॉक्टर औषधोपचार करीत असल्याची तक्रार जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्याकडे केली. त्या बोगस डॉक्टरकडे कुठलाही शासन मान्यता प्राप्त वैद्यकीय परवाना नसताना (विना रजिस्ट्रेशन) तो हॉस्पिटल चालवित होता. यावर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमरीश मोहबे यांनी ही माहिती पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांना देवुन कारवाईसाठी मदत करण्याची विनंती केली. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी आपले पोलीस पाठवून शल्य चिकित्सक डॉ. मोहबे, वैद्यकीय अधीक्षक गोरेगाव यांच्यासह पोलीस पथकाने गोरेगाव येथील डॉ. नितेश बाजपेयी याच्या हॉस्पिटल येथे पोहचून रजिस्ट्रेशन परवाना बाबत विचारले.

त्या ठिकाणी असलेल्या नर्स स्टाफ कडून कोणत्याही प्रकारचा रजिस्ट्रेशन परवाना नसल्याबाबत सांगून उडवाउडवीची उत्तरे दिली. या हॉस्पिटलमध्ये एक महिला दाखल होती. तिच्यावर विना पात्रता धारक डॉक्टरद्वारे (बोगस डॉक्टर द्वारे) औषधोपचार सुरू होते. त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचे रजिस्ट्रेशन नव्हते. वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय पटले यांनी रितसर कारवाई केली. या बोगस डॉक्टरविरुद्ध वैद्यकीय अधीक्षक विजय पटले यांच्या तक्रारीवरुन गोरेगाव पोलिसांनी महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीसनर अॅक्ट १९६१ चे कलम ३३ (२) ब अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस निरीक्षक भुसारी यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक सुजित घोलप करीत आहेत.

# देशी कट्ट्यासह तिघे पोलिसांच्या ताब्यात

**गोंदिया :** लोकसभा निवडणुकीला घेऊन अलर्टमोडवर असलेल्या रावणवाडी पोलिसांनी गुरुवारी (दि.२१) रावणवाडी शिवारातील गोंदिया-बालाघाट मार्गावर असलेल्या आरटीओ बॅरेल येथे मोटारसायकल अडवून एका दुचाकीवरील तीन मुलांना पकडले.त्यांच्या जवळून एक देसी कट्टा जप्त करण्यात आला.

गोंदिया जिल्हयातील सर्व पोलिस ठाणे हद्दीत अवैध धंद्यावर कारवाई करणे व गुन्हेगारीवर आळा घालण्याकरीता पोलिस अधीक्षक निखील पिंगळे यांनी सर्व ठाणेदारांना आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने रावणवाडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर, सहायक पोलिस निरीक्षक सुनील अंबुरे, हवालदार संजय चौहाण गुरुवारी (दि.२१) रात्रीच्या वेळी रावणवाडी हद्दीत खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करीत असताना त्यांना काही मुले देसी कट्टा विक्रीच्या तयारीत असल्याची गुप्त माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी गोंदिया-बालाघाट मार्गावरील आरटीओ बॅरेल जवळ सापला लावला. दरम्यान, मोटारसायकल क्रमांक एमपी ५०-एमटी ७१९८ वर ट्रिपल सीट बसून बालाघाटहून गोंदियाकडे येत असलेल्या तिघांना थांबविले. यामध्ये आरोपी विशाल मुलायचंदसिंह लिल्हारे (२३, रा. बगदरा, बालाघाट-मध्यप्रदेश) व त्याच्या सोबत असलेल्या दोन विधीसंघर्षीत बालकांची झडती घेतली असता ५० हजार रुपये किंमतीचा एक देसी कट्टा मिळून आला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक निखील पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा, उपविभागीय पोलिस अधिकारी रोहीणी बानकर यांच्या मार्गदर्शत रावणवाडीचे निरीक्षक अहेरकर, सपोनि. अंबुरे, हवालदार संजय चौहाण यांनी केली आहे.



### मोटारसायकल व कट्टा केली जप्त

**पोलिसांनी तिघा मुलांची झडती घेतली असता त्यांच्याकडे देसी कट्टा आढळून आला. यावर पोलिसांनी ५० हजार रुपये किंमतीचा देसी कट्टा व ३० हजार रुपये किंमतीची मोटारसायकल क्रमांक एमपी ५०-एमटी ७१९८ तसेच १३ हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल असा एकुण ९८ हजार रूपयांचा माल जप्त केला. रावणवाडी पोलिसांनी आरोपीवर भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. तपास पोलिस निरीक्षक अहेरकर यांच्या मार्गदर्शनात सपोनि. अंबुरे करीत आहेत.**

# इटियाडोह कालव्याला भगदाड

## शेतीसह रस्त्याचे नुकसान: उपाययोजना करण्याची मागणी



**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यात सध्या उन्हाळी धान पिकाचा हंगाम सुरु आहे. अशातच उन्हाचा तडाखाही वाढत आहे. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई सुरू झाली आहे. अशातच इटियाडोह कालव्यावरुन अतिरिक्त पाण्याची नासाडी होताना दिसत आहे. कालव्यावरुन अतिरिक्त पाणी विनाकारण वाहत असल्याने शेतीसह लगतच्या रस्त्याचेही नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. इटियाडोह पाटबंधारे विभागाने त्वरित पावले उचलून कालव्यातील विनाकारण वाहत असलेल्या पाण्याचा बंदोबस्त करण्याची मागणी सिरोली परिसरातील शेतकरी व नागरिकांनी केली आहे.

सिरोली व बुटाई कॅम्प परिसरातील नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार या परिसरात सध्या उन्हाळी धान पिकाचा हंगाम सुरु आहे. धानपिकाला इटियाडोहच्या मुख्य कालव्यातून पूरक कालव्याद्वारे सिरोली बुटाई कॅम्प महागाव व इतर गावांना पाणी देण्यात येते. मात्र इटियाडोह पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षामुळे पूरक कालव्यावरुन विनाकारण पाणी वाहत आहे. या अतिरिक्त पाण्यामुळे काही प्रमाणात शेतीचे नुकसान होत असल्याची माहिती आहे. सोबतच सिरोली-बुटाई कॅम्प-केशोरी हा रस्ता नव्यानेच तयार झाला असून सिरोलीजवळ या अतिरिक्त पाण्याचा नेहमीच जलसाठा जमा होतो. पाणी साचल्याने रस्त्याचे नुकसान होत असून या मार्गाचा दर्जा कसा टिकणार? असा प्रश्न यानिमित्त उपस्थित होत आहे. सोबतच मालकनपूर जवळील इटियाडोहचा मुख्य कालवा फुटला असल्याची विश्वसनीय माहिती मिळाली असून त्यामुळेही शेतीचे मोठे नुकसान झाल्याची माहिती आहे. इटियाडोह पाटबंधारे विभागाने त्वरित पावले उचलून कालव्यावरुन विनाकारण वाहत असलेल्या पाण्याचा बंदोबस्त करण्याची मागणी सिरोली परिसरातील शेतकरी व नागरिकांनी केली आहे.

# लाखो क्विंटल धान उघड्यावर; धानाची सुरक्षा ताडपत्रीच्या भरवशावर

**गोंदिया :** जिल्हा मार्केटिंग फेडरेशन (Marketing Federation) आणि आदिवासी विकास महामंडळ या दोन एजंन्सींच्या माध्यमातून सब एजंट संस्थांनी हमीभाव केंद्रावरून २५ लाख क्विंटलहून अधिक (Paddy securit) धानखरेदी केले आहे. परंतु, साठवणुकीसाठी पर्याप्त प्रमाणात गोदाम उपलब्ध नसल्याने खरेदी केलेला धान उघड्यावर पडून आहे. जिल्ह्यात मागील दोन ते तीन दिवसांपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. यामुळे उघड्यावर पडून असलेल्या धानाची सुरक्षा ताडपत्रीच्या भरवशावर असल्याचे दिसून येत आहे. धान पाण्यात सापडल्याने कोट्यवधीचे नुकसान होणार, असेच दिसून येत आहे.

जिल्ह्यात खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात आले. यंदाच्या खरीप हंगामात ३२ लाख क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. उद्दिष्ट पूर्ती अभावी धान खरेदीची मुदत वाढविण्यात आली आहे. जिल्हा मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळ या दोन प्रमुख एजंन्सीच्या नियंत्रणाखाली सब एजंट संस्थानी धानखरेदी प्रक्रिया राबविली.

यादरम्यान जिल्ह्यातील नोंदणीकृत शेतकऱ्यांनी २५ लाख क्विंटलहून अधिक धान हमीभाव केंद्रात विक्री केले. मात्र शासन आणि राईस मिलर्स यांच्यातील तिढा सुटला नाही. यामुळे भरडाईसाठी असलेला अनेक धान राईस मिलर्सकडून उचल करण्यात आला नाही. याचा फटका यंदाच्या हंगामात खरेदी करण्यात आलेल्या धानाला बसत आहे. गोदाम हाऊसफुल असून अनेक केंद्रावर खरेदी करण्यात आलेला धान केंद्राच्या आवारात पडून आहे. ताडपत्री झाकून संस्था संचालक व ग्रेडर मोकळे झाले आहे.

या प्रकाराने धानाची सुरक्षा वाऱ्यावर आहे. असे असतानाच मागील दोन ते तीन दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. (ता.१९) तर संपूर्ण जिल्ह्याला पावसाने झोडपून काढले. अशा परिस्थितीत केंद्रात उघड्यावर पडून असलेला धानाची सुरक्षेचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे. अवकाळी पावसाने धान भिजून मोठी घट येणार, असे चित्र दिसत आहे. यामुळे शासनाला कोट्यवधीचा नुकसान होणार असून धानाची सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. एंकदरीत जिल्ह्यातील हमीभाव केंद्रावर धानाची सुरक्षा ताडपत्रीच्या भरवशावर असल्याचे सदृश्य चित्र निर्माण झाले आहे.



### घट भरुन काढणार कोण?

**हमीभाव केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानाच्या सुरेक्षाचा प्रश्न नेहमीच चर्चेत असतो. शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेला धान केंद्रात ताडपत्री झाकून उघड्यावर पडून आहे. त्यामुळे मोकाट जनावरे, अवकाळी पाऊस यामुळे मोठ्या प्रमाणात घट येणार आहे. उघड्यावरील खरेदी केलेल्या धानाची पुरेपूर उचल करण्यात येत नसल्याने, दरवर्षी हजारो क्विंटल धान पावसामुळे खराब होते आहे आणि त्यामुळे शासनाला करोडो रुपयांचा चुना लागत आहे. असे असले तरी उपाययोजनेकडे दुर्लक्ष केले जाते. यामुळे घट भरून काढण्याची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.**

# दरोडा घालणारा जेरबंद,१५ लाखाचा मुद्देमाल हस्तगत

**गोंदिया:** शहरात झालेल्या घरफोडीतील आरोपीला शहर पोलिस व गुन्हे प्रकटीकरणाच्या पथकाने ताब्यात घेतले. आरोपीच्या घर झडतीतून चोरी केलेल्या १५ लाख ३३ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले.साहील उर्फ माट्या राजू आंबेकर (२४) रा. विठ्ठल मंदिर वार्ड, निंबाळकर वाडी, चंद्रपूर असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी आरोपीला आज न्यायालयत हजर करून २६ मार्चपर्यंत पोलिस कोठडी घेतली असल्याची माहिती अपर पोलिस नित्यानंद झा यांनी २२ मार्च रोजी शहर पोलिस ठाणे येथे माध्यम प्रतिनिधींना दिली.



शहरातील वर्दळीच्या सिव्हिल लाईन परिसरात ९ मार्च रोजी साहीलने मो. जाफर मो. आमीन कुंडरेवाला यांच्या घरी चोरी करुन ५५ तोळे सोन्याचे दागिण्यांसह रोख रक्कम लंपास केली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंद करुन तपास सुरू केला. दरम्यान शहर पोलिस ठाणेचे ठाणेदार चंद्रकांत सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरिक्षक सोमनाथ कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळ व सीसीटीव्ही फुटेज तपासले. आरोपीचा शोध घेणे कठीण असताना गोपनिय माहिती व तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला.

विशेष म्हणजे यावेळी २०० पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेजचा पोलिसांनी तपास केला. तपासात आरोपी साहिल हा खूनाच्या गुन्ह्यात वर्धा रेल्वे पोलिसांच्या ताब्यात असल्याची माहिती मिळाली. २० मार्चपर्यंत त्याला पोलिस कोठडी होती. कोठडी संपताच २१ मार्च रोजी गोंदिया पोलिसांनी साहीलला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली. यावेळी त्याने चोरी केल्याचे कबूल केले. त्याच्या घराची झडती घेत चोरीतील १५ लाख ३३ हजार रुपयाचे दागिने हस्तगत केले. २२ रोजी साहिलला पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता २६ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली असल्याची माहिती झा यांनी दिली. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी रोहिणी बानकर, पोलिस निरिक्षक चंद्रकांत सुर्यवंशी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक दिनेश लबडे, सहायक पोलिस निरिक्षक सोमनाथ कदम उपस्थित होते.

### आरोपी साहीलवर खूनासह २५ गुन्हे दाखल

**आरोपी साहिलावर चंद्रपूर जिल्ह्यात खून, घरफोडीसह विविध तब्बल २५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. १२ मार्च रोजी चंद्रपूर रेल्वे स्थानकात एका तरुणाची साहीलने हत्या केली होती. या गुन्ह्यात त्याला रेल्वे पोलिसांनी अटक केली होती.**

# आसोलीत ना डॉक्टर,ना परिचर

## परिसरातूल १० गावांमधील १० हजार पशुधन वाऱ्यावर: तीन वर्षांपासून हेळसांड सुरुच

**गोंदिया:** आसोली पशुवैद्यकीय दवाखान्यात गत तीन वर्षांपासून पशुधन विकास अधिकारी फक्त नावाला, डॉक्टर नाही कामाला अशी अवस्था झाली आहे. त्यामुळे १० गावांतील १० हजारांवर पशुधनाचे आरोग्य धोक्यात आले आहे. तीन वर्षांपासून पशुधन वैद्यकीय अधिकाऱ्याची मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे. आता तर परिचरदेखील नसल्याने रुग्णालय कुलूपबंद राहत असल्याने खासगी डॉक्टरांवरच विसबूंन राहावे लागत आहे.

आसोली पशुवैद्यकीय दवाखाना दहा गावे कार्यक्षेत्र असलेले रुग्णालय आहे. तालुक्यात आसोली पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये मोडतो. आसोली येथील पशुवैद्यकीय दवाखान्याला गेल्या तीन वर्षांपासून पशुधन अधिकारी दवाखाना सांभाळत आहेत. ज्यावेळी शेतकरी दवाखान्यात पशुधन घेऊन येतात. मात्र येथे डॉक्टरच उपलब्ध नसतात. फक्त परिचराच्याच भरवशावर रुग्णालय सुरु असते.

आता परिचर म्हणून कार्यरत मनोहर मयाराम नंदेश्वर यांचे स्थानांतरण आरोग्य विभागात झाल्याने आता संपूर्ण रुग्णालयच निर्मनुष्य झाले आहे. दहा गावांचा पसारा असलेल्या रुग्णालयात अधिकारी, कर्मचारी नसल्यामुळे खासगी डॉक्टरांकडून उपचार करुन घ्यावा लागत असून त्याचा परिणाम लसीकरणावरही झाला आहे.

या रुग्णालयांतर्गत आसोली, मुंडीपार खुर्द, नवरगाव कला, इर्री, नवरगाव खुर्द, मोरवाही, बटाणा, बरबसपुरा, टेमणी, आंभोरा या गावांचा समावेश होतो.

### अडचणी वाढल्या

**पशुधन अधिकारी कायमस्वरूपी नसल्यामुळे पशुपालकांची मोठी अडचण आहे. तालुका व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन कायमस्वरूपी पशुधन अधिकाऱ्याची नेमणूक करावी. तीन वर्षांपासून रुग्णालय वाऱ्यावर आहे.**

**तोमेश्वरी कटरे, पं.स.सदस्य**

### तात्काळ नेमणूक करा

**आसोली येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात नियमित पशुधन अधिकारी आणि इतर कर्मचारी नाहीत. त्यामुळे पशुपालकांची प्रचंड गैरसोय होत आहे. त्याचा परिणाम दुग्ध उत्पादनावर पडला असून जनावरे दगावण्याचे प्रमाणही वाढले आहे. जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. आगामी सभेत यावर प्रश्न उपस्थित करणार आहे.**

**लक्ष्मी तरोणे, जि.प.सदस्य**




# नवेगावबांध येथील नौकाविहार बंद

**नवेगावबांध:** विदर्भातील सुप्रसिद्ध असे गोंदिया जिल्ह्यातील नावाजलेले नवेगावबांध पर्यटनस्थळ व या पर्यटनस्थळी असलेल्या तलावावर असंख्य पर्यटक नौकाविहार करुन आनंद व्यक्त करतात. त्यातून वर्षाकाठी १५ लाखांहून अधिक महसूल येथील संयुक्त वन व्यवस्थापन समितीला प्राप्त होतो. परंतु गत कित्येक महिन्यांपासून याठिकाणी नौकाविहार बंद आहे.

या नौकाविहाराचे व्यवस्थापन संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडे आहे. परंतु नोव्हेंबर २०२२ पासून या समितीचे योग्य संचालन होत नसून या समितीचे सचिव जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. मागील एक वर्षांपासून हे नौकाविहार बंद आहे. त्यामुळे या पर्यटनस्थळी नौकाविहारामधून प्राप्त होणारा महसूल व रोजगार दोन्ही बुडत असून संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या निष्क्रीयतेमुळे नवेगावबांध येथील पर्यटनाला उतरती कळा आली आहे.



याकडे समिती व वनविभाग संवेदनशील नसल्याचे पर्यटक व गावातील पर्यटनप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे नवेगावबांध पर्यटक संकुलातील बागबगिच्यांची योग्य नियोजनाअभावी दुरवस्था होत आहे.







# शांततापूर्ण व निर्भय निवडणुकांसाठी यंत्रणांनी दक्ष राहावे : मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम

**भंडारा :** राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी ११ भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक विषयक पूर्वतयारीचा आढावा घेतला.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस अधीक्षक लोहित मतानी, अतिरिक्त जिल्हाधिकारी आशा पठाण, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर रणदिवे यांच्यासोबत गोंदिया जिल्हाधिकारी प्रजीत नायर व पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.

श्री. चोक्कलिंगम यांनी गोपेवाडा आणि पलाडी येथील प्रस्तावित मतमोजणी व्यवस्था केलेल्या केंद्रांना भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी कार्यकारी अभियंता पराग ठमके, जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. वंजारी यांच्या सह पोलीस अधिकारी उपस्थित होते. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षातील विविध कक्षांना त्यांनी भेट देऊन कामाची माहिती घेतली.

यावेळी आदर्श आचारसंहिता कक्ष, १९५० हेल्पलाइन नंबर, तसेच नियंत्रण कक्षातील स्थानिक संपर्क क्रमांक याबाबत व अन्य दैनंदिन निवडणूक विषयक कामाची माहिती अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री .रणदिवे यांनी त्यांना दिली. सि-व्हिजिल ॲपवरील येणाऱ्या तक्रारींचे निराकरण दिलेल्या वेळेतच करावे, कक्षाच्या विविध कामांवर संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी सनियंत्रण ठेवावे. खर्च खर्च समितीने रोज आलेल्या खर्चांवरती नजर ठेवून अहवाल आयोगास विहित वेळेत सादर करावे. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीच्या कक्षांची पाहणी त्यांनी यावेळी केली.



त्यानंतर झालेल्या आढावा बैठकीत ११, भंडारा- गोंदिया लोकसभा मतदारसंघासाठी केलेल्या पूर्वतयारीमध्ये प्रामुख्याने मनुष्यबळ व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, खर्च नियंत्रण पथक, सहाय्यक मतदान केंद्र, मतदान केंद्रावरील दिव्यांग बांधवांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा, निवडणूक कार्यासाठीचे आवश्यक प्रशिक्षण, निवडणूक कार्यासाठीचे साहित्य भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील दुर्गम भाग व तेथील संवाद व्यवस्था तसेच निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक त्या निधीची मागणी करण्याबाबत त्यांनी सूचित केले .

निवडणूक कार्याविषयी मार्गदर्शन करणाऱ्या विविध पुस्तिका प्राप्त करुन घेऊन त्या संबंधितांपर्यंत पाठवाव्यात असे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. पोस्टल बॅलेट, जिल्हा निवडणूक आराखडा, तसेच संपर्क व्यवस्था नसलेल्या ठिकाणी करण्यात आलेल्या पर्यायी संपर्क व्यवस्थेबाबतही त्यांनी आढावा घेतला.

मतदार जागृतीसोबतच नोटा याबाबत देखील नागरिकांना माहिती देणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तृतीयपंथीय मतदारांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग जिल्हा प्रशासनाने आश्वस्त करावा. ज्या मतदान केंद्रावरील मतदानाचे प्रमाण कमी आहे, त्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर मतदार विषयक जनजागृती करावी.

खासगी आस्थापनांमध्ये कार्यरत मतदानासाठी प्रवृत्त करावे तसेच तेथील कार्यरत कामगारांना मतदानासाठी पगारी सुटी मिळेल याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी खासगी आस्थापनांची बैठक घेण्याची सूचना त्यांनी यावेळी केली.

मतदान प्रक्रियेत मतदान केंद्रावरील वेबकास्टिंग विषय नियुक्त चमुचे सनियंत्रण वेळोवेळी करण्यात यावे, तसेच निवडणुकीदरम्यान नगदी रक्कम तसेच मतदारांना आमिष दाखवण्यासाठी करण्यात येणाऱ्या बाबींच्या वाहतुकीवर लक्ष ठेवण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी भंडारा श्री.कुंभेजकर यांनी संगणकीय सादरीकरण करुन जिल्ह्यातील पूर्वतयारीचा आढावा त्यांना दिला. निर्भय आणि निष्पक्ष वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी लोकशाहीला बळकट करण्यासाठी सेवा करण्याची ही संधी असून या संधीचा उपयोग करुन लोकशाही प्रक्रिया बळकट करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# गोंदियात चारही विधानसभा मतदार संघाला मतदान यंत्र सुपूर्द

## जिल्हाधिकारी यांची उपस्थिती, राजकीय पक्षही उपस्थित

**गोंदिया:** भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक १९ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोंदिया येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या गोदामात सिलबंद असलेल्या ईव्हीएम मशीन विधानसभा मतदार संघनिहाय आज वाटप करण्यात आल्या. ईव्हीएम-व्हीव्हीपॅट वाटप करण्याकरीता आज सकाळी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत राजकीय पक्षांच्या समक्ष जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांना मतदान यंत्र वाटप करण्यात आले असून या मशीन पोलीस बंदोबस्तात चारही विधानसभा मतदारसंघात पोहचविण्यात येणार आहेत.

यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी गोंदिया पर्वणी पाटील, जिल्हा विज्ञान सूचना अधिकारी पंकज गजभिये, तहसिलदार समशेर पठाण, अपर



तहसिलदार विशाल सोनवणे, तहसिलदार सडक अर्जुनी अक्षय पोयाम, तहसिलदार आमगाव रविंद्र होळी, पोलीस उपनिरीक्षक अश- ोक कोरे, पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्रहास गोळघाटे, राजकीय पक्षाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नानू मुदलीयार, भाजपचे तिजेश गौतम, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रतिक लांजेवार व राघवेंद्रसिंह बैस, काँग्रेसचे राजकुम ार पटले उपस्थित होते.

६३-अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात ३१९ मतदान केंद्र असून कंट्रोल युनिट- ४१४, बॅलेट युनिट- ४१४ व व्हीव्हीपॅट ४४६ आहेत. ६४-तिरोडा विधानसभा मतदारसंघात २९६ मतदान केंद्र असून कंट्रोल युनिट- ३८४, बॅलेट युनिट- ३८४ व व्हीव्हीपॅट ४१४ आहेत. ६५-गोंदिया विधानसभा मतदारसंघात ३६२ मतदान केंद्र असून कंट्रोल युनिट- ४७०, बॅलेट युनिट- ४७० व व्हीव्हीपॅट ५०६ आहेत. ६६-आमगाव विधानसभा मतदारसंघात ३११ म तदान केंद्र असून कंट्रोल युनिट- ४०४, बॅलेट युनिट- ४०४ व व्हीव्हीपॅट ४३५ आहेत. जिल्ह्यात एकूण १२८८ मतदान केंद्र असून कंट्रोल युनिट- १६७२, बॅलेट युनिट- १६७२ व व्हीव्हीपॅट- १८०१ आहेत.

# बिरसीच्या नागरिकांचा मतदानावर बहिष्कार

## नगरपालिकेच्या पेचावरुन निर्णय, महिलांचा पुढाकार

**आमगाव:** येथील नगर परिषद स्थापनेचा विषय राज्य सरकारने मागील नऊ वर्षापासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित ठेवला असून अद्यापही या प्रकरणावर निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. यासाठी आता नगर परिषद संघर्ष समितीच्या माध्यमातून निर्धार करुन आगामी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. बिरसी गावातील महिलांच्या पुढाकाराने माझा गाव माझा बहिष्कार घोषणा देत राज्य सरकारविरोधात ठाम भूमिका ठेवली.




राज्य सरकारने नगरपरिषद स्थापनेचा विषय प्रलंबित ठेऊन आठ गावांतील नागरिकांना मिळणाऱ्या योजना व सुविधांपासून वंचित ठेवले. त्यामुळे नागरिकांना घरकुल योजनेसह एकूण योजनेचा लाभ शून्य ठरला आहे. नगरपरिषद संघर्ष समितीच्या पुढाकाराने आता हा विषय आक्रमक पवित्रा घेत नागरिक हितासाठी सरळ होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेण्यात आलु.यापुर्वीच नगरपरिषद संघर्ष समितीच्यावतीने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री व केंद्रीय निवडणूक आयोगाकडे याबाबत लेखी निवेदन सादर करण्यात आले. परंतु प्रशासनाने त्याची दखल घेतली नसल्याने गावपातळीवर नागरिकांनी मतदानावर बहिष्कार घातला.

# गडचिरोली-चिमूर लोकसभेसाठी काँग्रेसचा सर्वसमावेशक चेहरा डॉ.नामदेव किरसान

**गोंदिया/गडचिरोली :** उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे ३ दिवस शिल्लक असताना शनिवारी रात्री उशिरा काँग्रेसने गडचिरोली- चिमूर लोकसभेसाठी डॉ. नामदेव किरसान यांची उमेद-वारी जाहीर करत सर्वसमावेशक अशा नव्या चेहऱ्याला संधी दिली. महायुतीकडून विद्यमान खासदार अशोक नेते यांना तिसऱ्यांदा संधी मिळाली आहे.

क्षेत्रफळाच्या दृष्टीने राज्यातील सर्वात मोठे लोकसभाक्षेत्र म्हणून गडचिरोली-चिमूर क्षेत्राची ओळख त्यामुळे निवडणूक प्रचारादरम्यान उमेदवारांना प्रत्येक भागात पोहोचणे शक्य होत नाही. त्यात यंदा मतदानाला अवघे तीन आठवडे शिल्लक असताना शनिवारी रात्री उशिरा महाविकासआघाडीकडून काँग्रेसचे डॉ. नामदेव किरसान यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. उमेदवारीसाठी काँग्रेसचे माजी आम दार डॉ. नामदेव उसेंडी यांच्यासोबत त्यांची रस्सीखेच होती.२०१४ व २०१९ च्या सलग दोन लोकसभा निवडणुकीत उसेंडी यांना पराभवाचा सामना करावा लागल्याने पक्षाने नवा चेहरा दिला म्हणावा लागेल.

राजकारण म्हणजे सत्ताकारण हा व्यवस्थेचा दृढ समज झाला आहे. पण, काही व्यक्तिमत्त्व अशी असतात, जे याकडे सेवेची संधी म्हणून बघतात. वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी या माध्यमाचा पुरेपूर वापर करतात. डॉ. नामदेव किरसान हे याच गटात मोडणारे. उच्चशिक्षित असलेले किरसान हे गेल्या अनेक वर्षांपासून गडचिरोलीच्या राजकारणात सक्रिय



आहेत. या काळात राजकारणातून उत्तम समाजकारण करता येते, हे त्यांनी दाखवून दिले आहे. उच्चपदस्थ नोकरीला राम राम ठोकत त्यांनी वेगळा मार्ग निवडला आणि गडचिरोली जिल्ह्यातील गावागावांत त्यांनी आपल्या कामाच्या आधारे अनेकांची मने जिंकली.

उच्च विद्याविभूषित अस- लेले किरसान उत्पादन शुल्क विभागात उपायुक्त होते. २००८ मध्ये स्वेच्छानिवृत्तीनंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला.गोंदिया जिल्हा काँग्रेस अध्यक्षपासून,प्रदेश सरचिटणीस व गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघ समन्वयक ते काँग्रेसच्या अनेक पदावर त्यांनी काम केले.

२०१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक गावापर्यंत त्यांनी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून पोचण्याचा प्रयत्न केलेला आहे. मग त्यांनी गडचिरोली ते नागपूर काढलेली पदयात्रा असो की विविध आंदोलनातून त्यांनी लोकांच्या समस्यांकरीता धावून जाण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तेव्हापासून ते गडचिरोली काँग्रेसमध्ये सक्रिय आहेत.दोनदा हुलकावणी मिळाल्यानंतर त्यांना यंदा संधी देण्यात आली आहे. ते पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.गोंदिया जिल्हा हा त्यांचा मुळ जिल्हा असल्याने या जिल्ह्यातली आमगाव-देवरी मतदारसंघावरही त्यांचा प्रभाव आहेच.त्यातच किरसान यांचा स्वभाव व विचार हा सामाजिक चळवळीला पोषक असल्याने आदिवासी, दलीत, ओबीसीं, अल्पसंख्याकाच्या कुठल्याही आंदोलनात म्हणा किंवा त्यांच्या कार्यक्रमात त्यांचा सहभाग हिरहिरीचा असतो.त्यांच्या या कार्यामुळे सुध्दा त्यांना या निवडणुकीत नक्कीच कुठे तरी सहकार्य होण्यास मदत होणार यात शंका नाही.

# लोकसभा निवडणूक मतदानासाठी "इपिक"सह बारा ओळखपत्र ग्राह्य

**गोंदिया :** ११ भंडारा-गोंदिया लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. निवडणूक आयोगाने मतदान करण्यापूवी मतदारांची ओळख पटविण्याकरीता मतदान ओळखपत्रासह (EPIC) १२ प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरलेले आहे. त्यामुळे आता लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदान करतांना मतदारांची ओळख पटविणे शक्य होणार आहे.



या ओळखपत्रात आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक व पोस्ट ऑफिसने जारी केलेल्या फोटोसह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, कामगार मंत्रालयाने जारी केलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र व राज्य सरकार/पीएसयू/पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना दिलेली छायाचित्र असलेली सेवा ओळखपत्रे, खासदार, आमदार यांना जारी केलेल्या अधिकृत ओळखपत्रांचा समावेश आहे. यामुळे लोकसभा निवडणुकीत मतदारांना मतदान करतांना कोणतीही अडचण येणार नाही. मतदार आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील.

लोकशाही बळकट करण्यासाठी गोंदिया जिल्ह्यातील मतदारांनी १९ एप्रिल रोजी जास्तीत जास्त संख्येने मतदान करून जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्याचा निर्धार करावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले आहे.

# डॉ.फुकें म्हणतात माघार...खरं तर पक्षानेच नाकारली लोकसभेची उमेदवारी

**गोंदिया:** लोकसभा २०२४ च्या निवडणूकीकरीता भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातून पुन्हा विद्यमान खासदार सुनिल बाबूराव मेंढे यांची उमेदवारी भारतीय जनता पक्षाने जाहिर केली. मेंढे हे दुसऱ्यांदा विजयी पताका फडकवतात काय याकडे लक्ष लागलेले असतानाच नागपूर निवासी व तत्कालीन भंडारा-गोंदिया विधानपरिषदेचे माजी आमदार डॉ.परिणय फुके यांना मात्र भाजपने पुन्हा लोकसभा निवडणुकीत उमेदावारीतून नाकारले आहे.मात्र डॉ.फुके हे नाना पटोलेंनी माघार घेतल्याने आपण माघार घेतल्याचे जे सांगत आहेत,ते याघडीला कुठेच तर्कसंगत नसल्याचे दिसून येत आहे.

तर विद्यमान खासदार सुनिल मेंढे यांनी आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात कुठल्याही राजकीय नेत्यांशी न केलेले गैरवर्तण आणि त्या नेत्यांवर टिकात्मक भाषेपासूनही केलेला बचाव यावेळी महायुतीमध्ये त्यांना उमेदवारी मिळवितांना मदतशीर ठरली आहे.

प्रफुल पटेलामुळे या मतदारसंघाच्या नावावर शिक्कामोर्तब अडकल्याची जी चर्चा सुरु आहे. त्या चर्चेलाच काही अर्थ नसून भाजपच्या उमेदवारामध्ये असलेल्या चुरसीमुळे आणि स्थानिक व बाहेरच्या या दोन मुद्यामुळेच खरं तरं भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला नावावर शिक्कामोर्तब करण्यात अडचण चालली होती,हे खरं कारण आत्ता या उमेदवारीने स्पष्ट झाले आहे.

मूळचे नागपूरचे असलेले डॉ.परिणय फुके हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खास जवळचे असल्यामुळे त्यांना २०१६ मध्ये नाना पटोले भाजपमध्ये असतांना भंडारा-गोंदियातून विधानपरिषदेची उम ेदवारी देण्यात आली होती.कारण काय तर फडणवीसांसह पटोलेंना राष्ट्रवादीचे राजेंद्र जैन यांचा पराभव करायचा होता. परंतु हेच डॉ.फुके आपल्यावर राजकीयदृष्टा वरचढ ठरतील याची किंचीतही मनात शंका न ठेवणारे पटोले राजकारणात फसले.आणि फुके यांनी विधानपरिषदेच्या अवघ्या तीन अडीच वर्षाच्या कार्यकाळानंतरच २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत उमेदवारीकरीता प्रतिष्ठापणाला लावली. त्यावेळी सुध्दा फुके हे मूळचे भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील नाही हा मुद्दा भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीतही जोरदार विरोध करण्यात आलेला होता.त्या विरोधात माजी आमदार चरण वाघमारे हे सर्वात पुढे होते. त्यावेळीही स्थानिक व बाहेरच्या मुद्यामुळेच फुके यांना अंतिम क्षणात उमेदवारीपासून वंचित रहावे लागले होते.



तीच परिस्थिती पुन्हा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बघावयास मिळाली. २०१९ च्याही अधित तुलनेत डॉ. फुके यांचा भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील मूळ अनेक भाजप नेत्यांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्थानिक व बाहेरचा हा मुद्दा रेटून धरल्याने पक्षातंर्गत कलह वाढीस गे- लेला होता. त्यातच विद्यमान खासदार मेंढे व माजी आमदार फुके यांच्यामुळे गटातटाचे राजकारण होत असल्याच्या अनेकदा वावड्या उठल्या होत्या. त्या वावड्या पक्षाच्या दिल्ली मुख्यालयापर्यंत यावेळी पोचल्या. आणि आचारसंहिता लागू होण्याच्या काही दिवसापासूनच लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात सोशलमिडियावर सर्वात समोर असलेले फुके हे अचानक मागे पडले.

आचारसंहिता लागू झाल्यानंतर भाजपमध्ये पहिल्या चार नावात सुनिल मेंढे यांच्यासोबत डॉ.परिणय फुके यांचे नाव राहिले असले तरी शेवटच्या आठवड्यात मात्र सुनिल मेंढे व विजय शिवणकर या दोन नावावरच चर्चा पक्षात होऊ लागली. त्यातच भंडारा अर्बन बँकेच्या कारभारात हस्तक्षेप करुन राष्ट्रवादीच्या संचालकांची झालेली तोडफोड राष्ट्रवादीच्या नेत्यांना पचणी पडलेली नव्हतीच त्यासह अनेक कारणांनी महायुतीत सहभागी झालेल्या राष्ट्रवादीनेही आम्हाला भंडारा-गोंदिया जिल्ह्यातीलच मूळचा उमेदवार द्या इतर नको ही भूमिका ठेवल्याने भाजपसमोर चांगलाच पेच फसलेला होता.

तो पेच अखेर होळीच्या दिवशी भाजपने महायुतीच्या घटक पक्षाला विश्वासात घेत सोडवित सुनिल मेंढे यांना पुन्हा रिंगणात उतरवले तर डॉ.फ ुकेंना दुसर्यांदा उमेदवारी नाकारल्याने हळूहळू डॉ.फुके यांचा परतीचा प्रवास या लोकसभा मतदारसंघातून सुरु होतोय की विधानसभेपर्यत थांबतोय याकडे लक्ष लागले आहे.

# डॉ.पडोळेंना उमेदवारी कार्यकर्त्यांच्या भावनांच्या विरोधात निर्णय

**भंडारा:** काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत भंडारा-गोंदिया मतदारसंघातून डॉ. प्रशांत पडोळे यांनी उमेदवारी दिली आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना पक्षाने येथून निवडणूक लढण्याची सूचना केली होती. परंतु पटोले यांनी राज्याच्या राजकारणात रस असल्याचे सांगून उमेदवारी टाळली अशी चर्चा आहे.



भाजपला आगामी लोकसभा निवडणुकीत कमीत कमी जागांवर रोखण्यासाठी अधिक प्रभावशाली नेत्यांना उमेदवारी देण्याचे धोरण काँग्रेस अंगिकारल्याचे दिसून येते. त्याचाच एक भाग म्हणून भंडारा-गोंदिया येथून नाना पटोले यांना लढण्याची सूचना करण्यात आली होती. परंतु त्यांनी नकार दिला आणि आपले समर्थक डॉ. प्रशांत पडोळे यांना उमेदवारी देण्याची मागणी पक्षाकडे केली. त्यांना निवडून आणण्याची जबाबदारी पटोले यांनी घेतल्याचे समजते. डॉ. प्रशांत पडोळे हे सहकारमहर्षी यादवराव पडोळे यांचे सुपुत्र आहेत. ते आयुर्वेदीक डॉक्टर असून त्यांच्या पत्नी भंडारा जिल्हा परिषदेच्या सदस्या आहेत.

विदर्भात सहकार महर्षी म्हणून ओळख असलेल्या दिवंगत यादवराव पडोळे यांचे सुपुत्र डॉ. प्रशांत यादोराव पडोळे यांच्यावर नानांनी एव्हढा विश्वास का टाकावा ? तर दिवंगत याद- वराव पडोळे हे नानांचे गुरू त्यामुळे गुरूंचे ऋण फेडण्यासाठी तर नानांनी डॉ. पडोळे यांना उमेद- वारी दिली नाही ना अशी चर्चा रंगू लागली आहे. कारण डॉ. प्रशांत पडोळे यांनी २०१४ झाली शिवसेनेच्या तिकीटावर साकोली विधानसभेची निवडणूक लढवली होती. त्यावेळी त्यांना केवळ २१५१ मते पडली होती. त्यांचा एवढा दारुण पराभव झाला होता की केवळ १ टक्के मते पडल्याने त्यांची अनामत रक्कम देखील जप्त करण्यात आली होती.एवढेच नाही तर लाखनी तालुक्यातील पालांदुर जवळील त्यांचे मूळ गाव असलेल्या घोडेझरी (अंदाजे ५०० लोकसंख्येचे गाव )येथून त्यांना केवळ १२ मते मिळाली होती. स्वतःच्या गावाशी नाळ जुळलेली नसलेले डॉ. प्रशांत पडोळे आणि या आधी दारुण पराभवाला सामोरे गेलेल्या डॉ. पडोळे यांना नानांनी का निवडले हा यक्ष प्रश्न आहे ?

पडोळे हे काँग्रेसमध्ये आल्यानंतर पटोलेंच्या संपर्कात आले. त्यांनी २०१९ ची निवडणूक लढवली नाही. या निवडणुकीत त्यांनी नाना पटोले यांचे काम केले. त्यातून त्यांची जवळीक वाढली आणि त्यामुळे थेट काँग्रेसच्या तिकीटावर लोकसभा निवडणूक लढण्याची संधी मिळाल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, नाना पटोले यांनी चार दिवसांपूर्वी जिल्ह्यातील एका कार्यक्रमात बोलताना मला भंडारा-गोंदिया जिल्हापर्यंत मर्यादीत करू नका. मला संपूर्ण राज्यात प्रचार करायचा आहे आणि भाजपला पराभूत करायचे आहे, असे म्हटले होते. तेव्हाच ते लोकसभा निवडणूक लढणार नाही. हे स्पष्ट झाले होते. परंतु त्यांनी २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत अमानत रक्कम जप्त झालेल्या नेत्याच्या उमेदवारीसाठी पक्षाकडे आग्रह का धरला असावा याचे कोडे पक्षातील नेत्यांनाच उमगले नाही.

# २० निवडणुकांत तब्बल ११ वेळा काँग्रेसचे वर्चस्व

**गोंदिया:** धान उत्पादक आणि तलावांचा जिल्हे म्हणून भंडारा-गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे. या दोन्ही जिल्ह्यांच्या सीमा मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्याला लागून आहेत. तर हावडा-मुंबई रेल्वे मार्गावर गोंदिया जिल्हा वसलेला आहे. राजकीयदृष्ट्यादेखील भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघ वजनदार नेत्यांचा मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. या मतदारसंघाने अनेक दिग्गज उमेदवारांना पराभवदेखील दाखविला आहे. १९५१ पासून हा मतदारसंघ अस्तित्वात आल्यानंतर या मतदारसंघात ११ वेळा काँग्रेस तर ६ वेळा भाजपने आणि दोन वेळा राष्ट्रवादी काँग्रेसने वर्चस्व स्थापन केले आहे.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचा आतापर्यंत झालेल्या निवडणुकांचा इतिहास पाहता या मतदारसंघातून मतदारांनी अपक्ष उमेदवरला नाकारले आहे. खा. प्रफुल्ल पटेल, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासारखे वजनदान नेते या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात राहत असल्याने या मतदारसंघाकडे संपूर्ण देशाच्या नजरा लागल्या असतात. या मतदारसंघाने आतापर्यंत सर्वाधिक ११ वेळा काँग्रेसला संधी दिली आहे. तर भाजपचे सहा वेळा खासदार या मतदारसंघातून झाले आहेत. तर खा. प्रफुल्ल पटेल, केशवराव पारधी यांना वगळता




या मतदारसंघातून सलग निवडून येण्याची संधी कुणाला मिळालेली नाही.

विशेष म्हणजे याच मतदारसंघाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्रीकांत जिचकार यांच्यासारख्या मातब्बरांना पराभव दाखविला आहे. गत २० वर्षाच्या कालावधीत या मतदारसंघाने सलग कोणत्याच पक्षाच्या उमेदवाराला संधी दिलेली नाही. मागील २० ते २२ वर्षांच्या कालावधीय या मतदारसंघातील राजकीय समीकरणसुद्धा बरेच बदललेले आहे. जातीय समीकरणेसुद्धा महत्वपूर्ण ठरली आहेत.

### यावेळी मतदार कुणाला पाठविणार लोकसभेत

### प्रफुल्ल पटेल यांची हॅट्रिक



**भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातून सलग निवडून येण्याचा रेकॉर्ड खा.प्रफुल्ल पटेल यांच्या नावावर आहे. ते १९९१,१९९६ आणि १९९८ ता कालावधीत सलग निवडून आले होते. त्यांचा हा रेकॉर्ड अद्याप कुणालाही मोडता आला नाही. या मतदारसंघाची २१ वी निवडणूक होत असून त्यासाठी भाजप आणि काँग्रेसकडून अद्यापही कुणालाही उमेदवारी जाहीर झालेली नाही. त्यामुळे या निवडणुकीत मतदार कुणाला संधी देतात हे महत्वपूर्ण ठरणार आहे.**

# किडंगीपारच्या नागरिकांचा मतदानावर बहिष्कार

**आमगाव:** गत दहा वर्षांपासून राज्य सरकारला नगरपंचायत ते नगरपरिषदेचा वाद मिटविता आला नाही. त्यामुळे नागरिकांना विकासात्मक योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. आता हा विषय नागरिकांनी उचलून घेतला आहे. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत मतदान नाही, अशी भूमिकाच नागरिकांनी घेतली.



आमगाव नगरपरिषद स्थापनेचा विषय राज्य सरकारने गत १० वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित ठेवल असून अद्यापही या प्रकरणावर निर्णय घेतला नाही.त्यामुळे नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. आता हा विषय नगरपरिषद संघर्ष समितीच्या माध्यमातून नागरिकांनी निर्धार करुन थेट लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. यात बुधवारी (दि.२०) नगरपरिषद परिक्षेत्रातील किडंगीपार व बनगाव येथील नागरिकांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या घोषणा देत निर्धार केला. यात नगरपरिषद संघर्ष समितीच्यावतीने गावात महिलांच्या पुढाकाराने माझे गाव, माझा बहिष्कार अशा घोषता देत लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार घालण्याची ठाम भूमिका गावकऱ्यांनी घेतली.

यापुर्वीच नगरपरिषद संघर्ष समितीच्यावतीने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री व केंद्रीय निवडणूक आयोगाकडे याबाबत निवेदन सादर केले. परंतु प्रशासनाने दखल न घेतल्याने गाव पातळीवर नागरिकांनी मतदानावर बहिष्कार घातला आहे. बुधवारी किडंगीपार व बनगाव येथील महिला व पुरुषांनी आपल्या तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या.